
आम्हां घरी धन..
तेव्हा कुठे?
तोचि साधु
शोकसभा
राजूकाका
अपमार्केट
आम आदमी
डॉ. नितीन मोरे

# आम्हां घरी धन ..

## डॉ. नितीन मोरे

ई साहित्य प्रतिष्ठान

# आम्हां घरी धन ..

लेखक:- **डॉ. नितीन मोरे,**

श्वसनरोग तज्ञ,
वसई, जि, पालघर.

Mobile No. 98209 37490, 98696 73415.

Email - drnmore@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक- ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahlty.com

esahlty@gmall.com

Whatsapp- 9987737237

(फ़्री पुस्तकांसाठी नाव व गाव कळवा)

प्रकाशन :- २२ एप्रिल २०२६

©esahlty Pratlshthan®2026

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# डॉ. नितीन मोरे



डॉ. नितीन मोरे हे व्यवसायाने डॉक्टर असून वसई, मुंबई येथे श्वसनरोग तज्ञ म्हणून सुप्रसिद्ध आहेत. त्यांना मराठी व इतर भाषा विषयांची आवड असल्याने त्यातूनच लिखाणाची आवड निर्माण झाली. सामान्यतः आजूबाजूच्या दैनंदिन घटनांतील विसंगती व त्यातून निर्माण होणारा विनोद हा त्यांचा आवडता विषय आणि त्यातून उपरोधात्मक लिखाण आणि मर्मभेदी टिप्पणी करण्यात ते माहीर आहेत. त्याचबरोबर आजूबाजूच्या व्यक्तीमधले नेमकेपण हेरून त्यावरही ते हीतात. त्यांच्या लेखनाचा कॅनव्हास नवनवीन प्रयोगांतून कायम विस्तारत असतो. त्यात पत्रलेखन, विज्ञानकथा, कहाण्या, नाटके, एकांकिका, नाट्यछटा, प्रेमकथा हे सर्व असते.

नेहमी दिवाळी अंकातून डॉक्टरांच्या विनोदी कथा प्रकाशित होत असतात. ई साहित्यवर त्यांचे हे बासष्टावे पुस्तक प्रकाशित होत आहे. त्यांचा स्वतःचा असा एक वाचकवर्ग आता निर्माण झाला असून तो त्यांच्या पुस्तकांची वाट पहात असतो.

**Mobile No. 98209 37490, 98696 73415.**

**Email -** drnmore@yahoo.com

# आम्हां घरी धन ..

## चार शब्द

आम्हां घरी धन

अर्थात

एक ना धड..

भारंभार खोगीरभरती..

खोगीरात काहीही भरता येते.

तशी येथे वेगवेगळ्या विषयांवर मल्लीनाथी करत केलेली ही खोगीर भरती!

इ. मल्लिनाथ..

अर्थात

डॉ. नितीन मोरे

आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने ।
शब्दांचीच शस्त्रे यत्न करू ।।
शब्दचि आमुच्या जीवाचे जीवन ।
शब्द वाटू धन जनलोका ।।
तुका म्हणे पहा शब्दचि हा देव ।
शब्देचि गौरव पुजा करू ।।

# अर्पणपत्रिका

## 'फोडिले भांडार' म्हणत शब्दांचे भांडार फोडून साहित्यरत्नांच्या खाणी उघडून देणाऱ्या विविध मराठी साहित्यिकांस सादर

# अनुक्रमणिका

१ आम्हां घरी धन..

२. सांगोवांगी

३. तोचि साधु ओळखावा

४. फेबुवरील सल्लागारी

५. पाल-हाळ

६. काहीतरी 'ऑरगॅनिक'

७.  राजुकाकाच्या काकापणाची गोष्ट

८.  ऋतुचक्रम

९. आदमी: आम, उद्दाम आणि दाम

१०. गोष्ट एका शोकसभेची

११. कालबाह्य

१२. अपमार्केट

१३. तेव्हा कुठे गेला होता..?

# आम्हां घरी धन..



आजच तो दिसला. डोक्यावर खांद्यावर हातात पिशव्या. भरगच्च भरलेल्या. नि भारलेल्या अवस्थेत स्वतःच्याच तंद्रीत चाललेला.

तो तसा प्रथितयश लेखक. डझनाहून अधिक पुस्तक प्रकाशित झालेला. अर्थात मागे त्याच्या घरच्या पोटमाळ्यावर न खपलेल्या पुस्तकांचे गठ्ठेच्या गठ्ठे पाहिले होते त्यामुळे कदाचित त्याला कथित यश ही म्हणता येईल. त्या पाठोपाठ त्याची सहधर्मचारिणी अर्धांगिनी त्या 'रद्दी'बद्दल करवादताना ही एकदा कानी आले होते. पण तो ढिम्म.

आता ही तो तसाच. तसाच म्हणजे तंद्री लावून. साधुसंत असे बसले की त्यास समाधी म्हणता येते. लेखक नि कवी लोक असे दिसले की त्यास तंद्री म्हणावे.. नि सामान्य कोणी असा दिसला की त्यास ढिम्म आणि मख्ख म्हणजे ज्याच्या तोंडावर मख्खी बसणार नाही असा.. असा भाषिक संकेत आहे. म्हणजे निर्लज्जपणा नि स्थितप्रज्ञता यांत जसे अंतर आहे तसेच अंतर या भाषेच्या उपयोजनात असावे!

तो तंद्रीत चाललेला. नाकापुढे पाहात. अंगाखांद्यावरचे ओझे वाहात.

"काय कुठे? इकडे कसा काय?"

"इकडे? मी सगळीकडे असतो. असू शकतो!"

"पण हे इतके वजन?"

"छे! वजन कसले? हा तर कच्चा माल. मी तर भारवाही हमाल!"

"कमाल आहे!"

"कमाल कसली? अरे मला यांची सर्वाधिक गरज लागते. सगळे इकडून तिकडून गोळा करून ठेवतो. कधी कुठे उपयोगी पडेल.. कधी कुणाची गरज पडेल सांगता येत नाही. कित्येकदा भर रात्री मला उठावे लागते. तेव्हा हे हाताशी नसतील तर पंचाईत .."

"छान! म्हणजे एवढा मालवाही हमाल तू."

"नाही. कच्चा माल हा कच्चाच असतो. नुसता कच्चा माल असला म्हणून काही कुणी कुशल कामगार होत नाही. तो कौशल्याने वापरावा लागतो.."

"खरेय.."

"पण कच्च्या मालाशिवाय कारागिरी ही नाही दाखवता येत ना!'

"हे ही खरेय!"

"आता हे सारे घेऊन जाईन ना तर घरी बोंबाबोंब होणार. ही ओरडणार. म्हणते, मेला बंब ही वापरत नाहीत ना चूल वापरत हल्ली, नाहीतर सारे चुलीत तरी घातले असते."

"खरंय.."

"काय?"

"म्हणजे चुलीत घालणे खरे नाही. चूल नि बंब वापरत नाही हल्ली कुणी हे खरेय.."

"पण तिचे तसे चूक नाही. ही धुंदी अशी आहे की त्यात वेळ जातो.. तासनतास नि दिवसेंदिवस. एका ठिकाणी मन गुंतले की दुसरे काही सुचत नाही. मग आपण आपल्या विचारात. ही काही म्हणाली तरी आपले लक्ष नसणार.. मग ही म्हणणार साधे ऐकून ही घेत नाही माझे.. ते ही खरेय.. पण माझा नाईलाज आहे रे.. एकदा एखादी गोष्ट डोक्यात शिरली की तिचाच विचार .. मग दुसरे काही सुचत नाही ना.."

"खरंच असणार ते.."

"असणार? आहेच! अरे म्हणून तर हे असे शब्द घेऊन चाललोय.."

"म्हणजे? अंगाखांद्यावर इतके वजन शब्दांचे आहे? ओझे?"

"ओझे? नाही रे! हे शब्दच तर आहेत. कुठून कुठून गोळा करून मुंग्यांसारखे वारूळात साठवून ठेवतो. कच्चा माल हा कुठल्याही लेखनाचा. तो महत्त्वाचा. त्याचे कसले वाटणार आहे ओझे?"

मी काही बोलणार त्याच्या आतच तो म्हणाला,

"तुला सांगू समस्या कोठे आणि कोणती ते?"

"समस्या?"

"हीच. आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने .. निव्वळ शब्द म्हणजे आमचे धन.. आणि धन म्हणजे निव्वळ शब्द! राहवत नाही म्हणून लिहायचे.. हेच आपले धन! हिचे खरेय.. चुलीत शब्द घालून चूल पेटत नाही.. रत्नासारखे शब्द नि शब्दांचीच रत्ने यांत महद् अंतर आहे बाबा.. तुला कळणार नाही.."

डोक्यावर खांद्यावर नि हातातल्या पिशव्यांतून शब्द शब्द भरून तो पुढे त्याच्याच तंद्रीत निघून गेला, त्याच्या झिजलेल्या टाचांच्या चपला घासत घासत..

त्याच्या त्या पिशव्यांतून मात्र शब्दांची रत्ने चमकत डोकावत होती!

# सांगोवांगी!



वृत्तपत्रे हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे म्हणतात. भौमितिक विचार केला तर कोणत्याही तीन बिंदूतून एक प्रतल जाते. तीन एका रेषेतील बिंदू स्थिर प्रतल देत असताना त्यात चौथ्या टेकूचे काम काय? थोडक्यात चौथा स्तंभ म्हणून वृत्तपत्राचे कोडकौतुक हे लहान मुलांस तू किती हुशार अशी समजूत काढण्यासारखे आहे कदाचित. अर्थात तशी वृत्तपत्रादि मधील लोकं तशी हुशार आहेत. आपले असलेले किंवा नसलेलेही महत्त्व ताडण्यात त्यांनी कसूर केली नाही. काही मागास पत्रकार ध्येयवाद या कालबाह्य संकल्पनेवर आधारित पत्रकारिता करत असतात. मग बातमीच्या बातमीमूल्याहून त्यांना विश्वासार्हता जास्त महत्त्वाची वाटत असते. कुणाला काय कशासाठी कधी अन कसे

महत्त्वाचे वाटेल सांगता येत नाही! पण आज सजग माध्यमांच्या काळात अशी चूक जास्त कोणी करत नाही. चटपटीतपणा हा बातमीचा मुख्य गुण. विश्वासार्हतेसाठी पब्लिक टीव्हीवर बातमी पडताळून पाहिल या विश्वासाने बातम्या छापल्या की काम फत्ते. सर्वाधिक खपाचे दैनिक बनणे महत्त्वाचे. अर्थात टीव्हीवाले पब्लिक इंटरनेटवर बातम्या तपासून पाहतील म्हणून सबसे तेज, पळा पळा कोण पुढे पळे तो म्हणत भागम भाग करत बातम्या देतात हा भाग वेगळा म्हणून वगळा!

हुशार पत्रकारितेने मात्र काळाची पावले ओळखली आहेत. ती ओळखून सांगोवांगी ऐकलेल्या कथा कहाण्यांना बातम्यांचा दर्जा देऊन त्यांचे उत्थान करण्याचा वसा घेतला आहे. त्या सत्याचा आधार घेत 'सांगोवांगी टाइम्स' हेच नाव घेत एक एप्रिलच्या मुहूर्तावर त्या नावाचे नवीन वृत्तपत्र आपल्या बाणेदार, दिलदार, खुमासदार, नमुनेदार पत्रकारितेसह सुरू झाले आहे ..

त्याच्या एका अंकातील हा काही निवडक नमुनेदार मजकूर.

मूळ वृत्तपत्र मिळवून वाचेपर्यंत वाचकांस खास नमुना म्हणून इथे सात निवडक वृत्ते सादर आहेत.

(अर्थात असे वृत्तपत्र खरेच आहे हे ठाऊक नसले तरी ते आहे असे सांगोवांगी कानावर आले आहे!)

***

**सांगोवांगी टाइम्स**

वर्ष पहिले अंक दुसरा

दि. २ एप्रिल २०२२

(एकमेव वाचक असणारे एकमेव दैनिक)

१.

दि. १ एप्रिल

श्रीरंगपूर

ठळक बातमीची बातमी

आज सकाळी श्रीरंगपूरात श्रीरंगपूर टाइम्सच्या कचेरीवर मोर्चा काढण्यात आला. श्रीरंगपूर टाइम्सच्या पहिल्या पानावरील मजकूर ठिपक्याइतकाही न दिसल्याने संपादक मजकुरांवर ठपका ठेवून संतप्त जमावाने कचेरीवर हल्लाबोल केला. तत्समयी संपादक महाशय कचेरीत कचोरी खात बसलेले होते. अशा प्रकाराबद्दल काहीच कल्पना नसल्याने त्यांना मोर्चाची बातमी उशिराच कळली. कचोरीचा बकाणा भरल्याने संपादक महाशय काही बोलू शकले नसले तरी श्रीरंगपूर टाइम्सचे श्री.रंगराव रंगारी यांनी संतप्त जमावाचे स्वागत पानपरागने केले. त्यामुळे हातातले सगळे फलक टाकून दंगा करणारा जमाव दोन्ही हाताने पुडी उघडण्यात दंग झाला. शांतता प्रस्थापित झाल्यावर रंगरावांनी शाईमध्ये भेसळ झाल्यामुळे लिहिलेल्या ठळक बातम्या पुसट झाल्या.. त्याबद्दल दिलगीर आहोत अशी पुडी सोडून दिली. त्यानंतर पानपरागची पुडी चघळत जमाव पुढील कामासाठी पांगला असे आमचा वार्ताहर कळवतो.

२.

दि.१ एप्रिल

शरणागतपूर

शरणागतपूरात आज दिनांक एक एप्रिल रोजी अखंड वीज पुरवठा होणार असल्याची बातमी विद्युत वेगाने पसरवण्यात हात असलेल्या तिघांना शरण येण्यास भाग पाडत शरणागतपूर पोलिस स्टेशनच्या सबइनस्पेक्टर बबनराव मोहिते यांनी अटक केली. अफवा पसरवणे हा अक्षम्य आणि अजामीनपात्र गुन्हा असून अशा जीवघेण्या अफवांनी जनतेत संभ्रम निर्माण होतो. आजवर वीज नसण्याची सवय असलेल्या नागरिकांना अशा अफवांमुळे अपेक्षाभंगाचा सामना करावा लागला, त्याबद्दल प्रशासन दिलगीर आहे असे स्थानिक प्रशासनाने आपल्या प्रेसनोट मध्ये म्हटले आहे. दरम्यान आपण शासनातीलच काही वरिष्ठांच्या सवयींचे अनुकरण करत ही बातमी पसरवत लोकांना स्वप्नात गुंगवण्याचा प्रयत्न करत असल्याचा कबुलीजबाब तिघांनी दिला आहे.

३.

एप्रिल १

जलदनगर

जलदनगरात जलपरीचे दर्शन?

जलदनगरातील एकमेव जलधर तलाव सुकल्याने त्यातील जलजीवनावर परिणाम झाला आहे. गेली तीन वर्षे या तलावाच्या स्वच्छतेची मागणी जनतेकडून होत होती. त्यामुळे स्वच्छता न होईतोवर जनतेने त्याच तलावात

कचरा टाकून प्रशासनाचा गेली तीन वर्षे संघटितपणे निषेध करणे सुरू ठेवले होते. गेल्या काही महिन्यात या प्रयत्नांना यश येऊन तलाव पूर्णपणे बुजवण्यात जनतेस यश आले आहे. निर्माल्य आणि कचरा यांचा संयुक्त निचरा करूनच हे साध्य झाल्याचे जनतेचे म्हणणे आहे. याच प्रयत्नांती जलपरीचे निवासस्थान बुजल्याने स्थानिकांनी जलपरी दर्शन झाल्याचे स्थानिक वार्ताहरास सांगितले. आपल्याला प्रत्यक्ष दर्शन झाले नसले तरी खुद्द प्रत्यक्षदर्शींनीच आपल्या मित्रास हे सांगितले असल्याचा त्यांचा दावा आहे. जलपरीबरोबर सेल्फी काढण्या अगोदरच ती नाहीशी झाल्याचा ही दावा करण्यात आला. दरम्यान प्रशासनातून हा तलाव हेरिटेज खाली असल्याने त्यास हात न लावता तो जसा आहे तसा ठेवण्यात येणार असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान जलधर तलावासमोर जनतेची रीघ लागली असून नाक मुठीत धरून जलपरीच्या पावलांच्या ठशांचा शोध जिज्ञासू जनता घेत असल्याचे दृश्य जलदपूरात दिसत आहे.

४.

दि.१ एप्रिल

रामरहिमपूर

रामरहिमपूरातील रस्त्यांचा प्रश्न दैनंदिन बिकट होत चालला असून रस्त्यांमध्ये खड्डे की खड्ड्यांत  रस्ता असा सवाल करत विरोधी पक्षीय नगरसेवकांनी खड्डा भरो आंदोलन लवकरच छेडण्याची घोषणा केली आहे. दरम्यान विद्यमान नगरसेवकांनी रस्ता आहे म्हणूनच खड्डे आहेत, गाव तिथे रस्ता आणि रस्ता तिथे खड्डा या शासननिर्णयानुसारच सारे होत असल्याचे

सांगोवांगी टाइम्सशी बोलताना सांगितले. खड्डे आणि विवरे ही पृथ्वीतलावरच नव्हे तर चंद्राच्या पृष्ठभागावरील ही आढळतात. तेव्हा विरोधी नगरसेवकांनी चंद्रावरही मोर्चा काढावा मग आमच्याकडे यावे असेही प्रतिपादन त्यांनी केले.

५.

दि.१ एप्रिल

उजाड शहर

आज उजाडशहरात स्थानिक आमदार व नगरसेवक यांच्या उपस्थितीत वृक्षारोपण समारंभ पार पडला. मागील वर्षी याच ठिकाणी याच वेळी अशी रोपे लावली होती, आमचे निसर्ग संवर्धनाचे काम अशाच जोमात सुरू राहिल आणि पुढील वर्षीही याच ठिकाणी आम्ही नवीन रोपे लावू असे आमदार श्री.शेखर साखरदांडे यांनी आपल्या भाषणात सांगितले. मागील वर्षी एक लाख रोपे लावून जागतिक उच्चांक प्रस्थापित केल्याने या वर्षी त्याहून जास्त रोपे लावण्याचा निश्चय केला आहे. नवीन रोपे लावण्यासाठी गरज पडल्यास आम्ही काही ठिकाणी झाडे तोडून तिथे नव्याने वृक्षारोपण समारंभ करू पण जागा कमी पडू देणार नाही आणि नवीन रेकॉर्ड बनवल्याशिवाय राहणार नाही असे नगरसेवक श्री.नारायण नगर्सेकर यांनी आपल्या छोटेखानी भाषणात सांगितले. एरवी पावसाळ्यात रोपे लावा असा कार्यक्रम हाती घेतला जाई. पण आम्हाला सारे ऋतू सारखेच, त्यामुळे भर उन्हाळ्यात हा कार्यक्रम हाती घेतला गेला आहे असेही ते म्हणाले. दरम्यान उजाड शहरात सत्ताधारी वर्गाने बराच उजेड पाडला

असून आता जनतेच्या डोक्यात उजेड पडला असून येत्या निवडणुकीत जनताच त्यांना उजाड करेल अशी बोचरी टीका विरोधी पक्षीयांनी केली आहे.

६.

दि.१ एप्रिल

लक्ष्मणनगरी, रामपूर.

काल येथे सर्वभाषीय, सर्वपक्षीय, सर्वजातीय, सर्वपंथीय, सर्वधर्मीय सभा यशस्वीपणे भरवण्यात आल्याचे वृत्त आहे. आजवर एकमेकांच्या विविध गोष्टींबद्दल सहिष्णुता बाळगल्याने आपापल्या भाषा, पक्ष, जात, पंथ, धर्म आदि सर्वांना ही सद्य अवकळा आली असल्याबद्दल सर्वभाषीय, सर्वपक्षीय, सर्वजातीय, सर्वपंथीय, सर्वधर्मीय एकदिलाने एकमत झाले. यापुढे एकमेकांच्या उरावर बसल्याशिवाय एकेकाच्या उन्नतीचा मार्ग खुला होणे नाही, त्यामुळे एकमेकांना पाण्यात पाहण्यासाठी येथील खंकाळे तलावातील गाळ उपसा करण्यात यावा व तेथील स्वच्छ पाण्यात सर्वभाषीय, सर्वपक्षीय, सर्वजातीय, सर्वपंथीय, सर्वधर्मीय लोक एकत्र येऊन एकमेकांना पाण्यात पाहातील अशी सोय शासनाने करून द्यावी अशी मागणी एकमुखाने करण्यात आल्याचे खात्रीलायक वृत्त आहे. दरम्यान तलाव भरण्यासाठी पर्जन्ययज्ञ करण्यात यावा अशीही मागणी एका समुदायाकडून करण्यात येत आहे.

७.

दि.१ एप्रिल

मुळगाव

आज दिनांक १ एप्रिल रोजी मुळगाव येथे झालेल्या चेंडू फळीच्या सामन्यामुळे दोन गटांत दुफळी झाल्याचे वृत्त आहे. याच्या जबाबदारीचा चेंडू दोन्ही बाजूंकडून एकमेकांकडे टोलवला जात असून त्यामुळे गावातील वातावरण तंग आहे. परिस्थिती हाताबाहेर गेली असली तरीही नियंत्रणात असल्याचे तेथील पालकमंत्री श्री.लालमण मुळे यांनी सांगोवांगी टाइम्सला सांगितले. गावात उसळलेली दंगल लवकरच नियंत्रणात येईल त्यानंतर गावात पुढील सहा महिने तरी दंगल होऊ दिली जाणार नाही असेही त्यांनी सांगितले. दंगलीमुळे सामान्य माणसाचे नुकसान होते आणि कोणतीही निवडणूक दृष्टीपथात नसताना दंगलीचा राजकीय पक्षांनाही फायदा होत नाही. परंतु पुढील दंगल निवडणुकीच्या दोन महिने आधी घडू शकते अशी इशारावजा सूचना ही त्यांनी बोलता बोलता दिली. मंत्रीमहोदय मुळे यांचे मुळगाव हे मूळगाव असूनही त्यांचा मुळीच प्रभाव येथे नाही, मुळात त्यांनी लक्षच न घातल्याने ही दंगल पेटली असा आरोप विरोधी पक्षनेते श्री.मधुकर मुळगावकर यांनी केला आहे. तर श्री.मुळे यांनी लक्ष घातल्यानेच दंगल पसरली असा आरोप दुसरे विरोधी नेते श्री. गावकर यांनी केला आहे. दरम्यान मुळगावात ज्या चेंडूफळीच्या सामन्यामुळे दंगल पेटली तो सामना अनिर्णित राहिला असल्याचे आमचा वार्ताहर कळवतो.

***

आणि ही सांगोवांगी टाइम्सची

सं.सं.भू. म्हणजे संक्षिप्त संपादकीय भूमिका.

सांगोवांगी टाइम्स : का आणि कसा?

वृत्तपत्रीय सत्य ही एक ओव्हररेटेड गोष्ट आहे असे आमचे स्पष्ट मत आहे. सत्याच्या शोधात गौतम बुद्धांना आयुष्य खर्ची घालावे लागले. अंतिम सत्याबद्दल अजूनही मतभेद होऊ शकतात.. आणि सत्य आणि असत्य नक्की काय किंवा कोण याबद्दल मनभेद ही संभवतात. थोडक्यात काय आम्ही छापतो ते सत्यच असा दुराग्रह कोणा वृत्तपत्राने बाळगणे हेच एक मोठे असत्य आहे. काळ बदलत चालला आहे. सत्यास मरण नाही किंवा सत्यमेव जयते सारख्या चमकदार घोषणा आता काळानुरूप बदलत चालल्या आहेत. सत्यासत्याबद्दल मतभेद असताना उगाच आम्ही म्हणू तेच सत्य हा मानभावीपणा कशाला? तेव्हा काळाची पावले ओळखून हा सांगोवांगी ऐकलेल्या बातम्या देणारा सांगोवांगी टाइम्स चा पहिला अंक हाती देताना अत्यंत आनंद होत आहे.

दुसरी अजून एक कालबाह्य गोष्ट म्हणजे अग्रलेख आणि संपादकीय. पूर्वी अग्रलेखांना मोठेच महत्त्व होते. लोक ते वाचून मत बनवायचे किंवा मत बदलायचे. आज इतका वेळ आहे कुणाला? समाज माध्यमातून होणाऱ्या

ज्ञानार्जानातून मत बनवणाऱ्या पिढीला कोणी ढुढ्ढाचार्य काय शिकवण देणार? तेव्हा आमच्या सांगोवांगी टाइम्स ने अग्रलेख ही संकल्पना हद्दपार करत संक्षिप्त संपादकीय भूमिका मधून मधून लिहिण्याची भूमिका घेतली आहे. शेकडो शब्दांचे अग्रलेख लिहिण्याहून थोडक्यात भूमिका मांडणे महत्त्वाचे. आमचे तर मत आहे की खरेतर कित्येकदा ती न मांडणे हीच एक भूमिका असू शकते! असो. तेव्हा सं.सं.भू. ही सांगोवांगी टाइम्स ची वृत्तपत्रीय विश्वाला दिलेली नवी संकल्पना आहे.

अर्थात सांगोवांगी टाइम्स हीच एक अभिनव संकल्पना आम्ही प्रत्यक्षात आणत आहोत. कानोकानी ऐकू येणाऱ्या सांगोवांगी गोष्टींना बातम्या म्हणून छापण्याचा प्रामाणिकपणा आम्ही येथे दाखवत आहोत. येथे आम्हाला पूर्वी एक कुणीतरी विचारलेला प्रश्न आठवतो.. महात्मा गांधींचा खरा पाईक कोण? सत्य आणि अहिंसा यावर विश्वास असल्याचे असत्य सांगणारा की असत्य आणि हिंसा यावरच विश्वास असल्याचे सत्य सांगणारा? तेव्हा सत्याचे नाव घेऊन असत्य छापण्याहून प्रामाणिकपणे सांगोवांगी बातम्या छापणाऱ्या आमचे कौतुक करणे हे समाजाचे नैतिक कर्तव्य आहे अशी आमची सडेतोड भूमिका आहे.

बाकी निडर निर्भीड निर्भय सडेतोड वगैरे पत्रकारितेची विशेषणे आम्ही आमच्या सं.सं.भू. मध्ये मधून मधून वापरून वृत्तपत्रांची उज्ज्वल परंपरा कायम राखण्याचे आश्वासन देत हा प्रथम अंक वाचकाहाती सोपवत आहोत.

'सांगोवांगी टाइम्स' चा नमुन्यादाखल हा मजकूर. अशा अत्यंत उद्बोधक सांगोवागी ऐकलेल्या बातम्यांसाठी 'सांगोवांगी टाइम्स'चे तत्काळ वर्गणीदार व्हा. सांगोवांगी मिळालेल्या माहितीनुसार लवकर येणाऱ्या पक्ष्यांना.. (पक्षी: अर्ली बर्ड्स) सांगोवांगी टाइम्सतर्फे एक लाऊडस्पीकर भेट देण्यात येईल. तेव्हा त्वरा करा.

# तोचि साधु ओळखावा

आपल्या महाराष्ट्राला बाबा बुवांची मोठी परंपरा आहे. कित्येक वर्षांपूर्वी आचार्य अत्रेंनी बुवा तेथे बाया हे अख्खं नाटक लिहिलं तेव्हा बुवांचं प्रस्थ किती असेल हे समजून यावे. पण तेच कशाला? अगदी ओरिजिनल आणि शंभर टक्के संत असलेल्या तुकाराम महाराजांनी 'ऐसे कैसे झाले भोंदू..' असे लिहून ठेवले असेल तर तेव्हाही हा महाराष्ट्र बुवा नि बाबांची परंपरा राखून होताच हे ध्यानी यावे. भूतकाळाभिमान किंवा खरंतर भूतकाळ-गर्व, परंपराभिमान किंवा परंपरा-गर्व हे एत्तदेशीय व्यवच्छेदक लक्षण आहे. असं असताना बुवा आणि बाबांचा अभिमान या महाराष्ट्र देशास वाटल्यावाचून कसा राहिल? बुवाबाजी, जादूटोणा इत्यादी आपल्या देशास ललामभूत असताना महाराष्ट्राचा टक्का घसरू न देणाऱ्या या बाबा बुवांचे महाराष्ट्र देशावर थोर उपकार आहेत. मागे उत्तरप्रदेशी बाबाच्या चारचाकी गाडीच्या चाकांची धूळ ललाटी लावणारे भक्तगण पाहिलेत आपण. त्याच रथचक्राखाली काही निस्सीम भक्तांना मोक्षप्राप्तीही झाली. आजवर सर्वच बाबींत पुढे असणाऱ्या महाराष्ट्राने या बाबतीत मागे राहून कसे चालेल?

पण नाही.

महाराष्ट्र नि मराठी माणसाला थोडा न्यूनगंड आहे. त्याला आपण मागे पडू का किंवा पडतो आहोत का असा प्रश्न नेहमीच पडत आला आहे. भाषा

असो की अजून काही, मराठी माणूस सदैव चिंतेत राहून महाराष्ट्र धर्माचे भले चिंतित असतो. काही ठिकाणी मराठी टक्का घटताना दिसत असेलही पण या अध्यात्मिकतेच्या बाबतीत तरी प्रगतीशील महाराष्ट्रास काळजी नसावी. बाबा नि बुवांच्या बाबतीत महाराष्ट्र स्वयंपूर्ण आहे. किंबहुना आपले भारतवर्ष देखील याबाबतीत आत्मनिर्भर आहे. कित्येक बाबा नि बुवांनी या देशातील नागरिकांचे आयुष्य सुसह्य केले आहे. पण आपला परीघ महाराष्ट्र देशापुरता असल्याने महाराष्ट्र धर्म वाढवणाऱ्यांबद्दलच विचार करावयाचा आहे.

विविध तपाचारणांतून बुवाबाजीस आयुष्य वाहून घेणाऱ्या ह्या गावोगावातील बाबांचे या महाराष्ट्रावरचे उपकार थोर आहेत. कित्येक बाबा हे स्वत: अशिक्षित असले तरी जीवन शिक्षणाबद्दल सदैव सजग असतात. ते स्वत: निरक्षर असले तरीही एखाद्या डबल पदवीधर, डॉक्टरेट असणाऱ्यालाही मार्गदर्शन करण्याची पात्रता धारण करून असतात. शालेय शिक्षण किती पुस्तकी व कुचकामी आहे याची असंख्य उदाहरणं डोळ्यांसमोर दिसत असल्यानेच असेल, आपली सरकारे ही शिक्षणावर फारसा खर्च करण्यास तयार नसतात. या मागे या स्वयं रोजगार निर्माण करणाऱ्या बाबा बुवांचा आदर्श नाही असे कोण म्हणू शकेल? मागे कुणी म्हणालेले, रोजगार रोजगार असल्या बोंबा सरकारांच्या नावाने मारण्यापेक्षा रस्त्याच्या कडेस भज्या तळून विकल्यात तर चार पैसे कमावाल. जमाना मोबाईलचा आहे तर चित्रविचित्र रीळं बनवून त्यातून पैसे कमवा. सरकारी पातळीवर इतके द्रष्टेपण असेल तर बाबा कि बुवांची

लाईन चालवणाऱ्यांचे कौतुक व्हावयालाच हवे. उगाच सरकारी नोकरीवर अवलंबून न राहता स्वत:ची नि आपल्या मठ किंवा मठीवर अवलंबून असणाऱ्यांची पोटे भरून वर कोट्यवधींची माया जमवणारे हे बाबा नि बुवा महाराष्ट्राच्याही अभिमानाचा विषय आहेत याबद्दल मनात यत्किंचित ही किंतु नसावा.

या बाबा बुवांचे कर्तृत्वही असे की आदराने मान झुकावीच. सालोसाल अखंड मेहनत, ज्यास तप असे अध्यात्मात संबोधले जाते, करीत हे साधु किंवा बाबा बुवा त्यांच्या पोझिशनला पोहोचले असतात. त्यामागे त्यांचे विशाल लागे नि बांधे विविध निम्न नि उच्च पदस्थांशी जुळत असले तरी ते एका विशिष्ट उंचीच्या आदानप्रदानाचा भाग आहेत हे विसरून चालावयाचे नाही. शेवटी माणूसच माणसाच्या कामी येतो ह्याचे स्वत:वरून उदाहरण घालून देणाऱ्या साधुपुरूषांबद्दल त्यासाठी कृतज्ञता दाटून येते. कित्येक बाबा नि बुवा अक्षर शत्रू असतात, काही अल्पसंख्येने उच्चशिक्षित असू शकतात. असे असले तरी आध्यात्मिक परिप्रेक्ष्यात निरक्षर बाबा कुण्या पीएचडी बाबाहून श्रेष्ठ असू शकतात. शिक्षण माणसास काही ज्ञान देऊ शकते पण या साधुपुरूषांकडून मिळणारे जीवन ज्ञान पुस्तकी शिक्षणात कोठून यावे?

तेव्हा या सत्पुरुषांचे ऋण मान्य करावयासच हवे.

या बाबा नि बुवांचे सामाजिक व राजकीय क्षेत्रावर थोर उपकार आहेत. एखाद्या जिज्ञासू मुलाने व्रात्यपणे एखाद्या गोष्टीच्या कार्यकारण भावाबद्दल 'हे कां?' 'हे असे कसे?' असले अजागळ प्रश्न विचारून भंडावून सोडावे की त्याच मुलाने आपल्याहून वय आणि अधिकाराने मोठ्या असलेल्यांचे 'बाबा वाक्यं प्रमाण' मानावे? बाबा नि बुवांचा आपल्या समाजास यातील दुसऱ्या प्रकारे समृद्ध करण्यात मोठाच हातभार आहे. उगाच नाकाने कांदे सोलत एखाद्या बाबीच्या खोलात शिरावे नि प्रश्नोपनिषद म्हटल्यासारखे त्या प्रश्नांच्या जंजाळात अडकत जावे, की रेडिमेड उत्तरांनी आयुष्य सुकर करावे? महत प्रयासाने प्राप्त झालेल्या या मनुष्य जन्मात असला वेळ व्यर्थ दवडावा की या महान सत्पुरुषांच्या शिकवणुकीतून डोळे झाकून आपली उन्नती घडवून आणावी? रात्र थोडी सोंगे फार असल्या या क्षणभंगुर आयुष्यात हे महान बाबा नि बुवा हे रेडिमेड ज्ञानाचे दिवे लावत मनुजाची नैया भवसागरातून पैलतीरी नेत असतील तर त्यांच्या उपकारांची महती काय वर्णावी? बाबा बुवांनी असे प्रशिक्षण द्यावे न त्याच मनुजाने सत्ताधीशाचा शब्द प्रमाण मानण्यास शिकावे यातून समाजात सारे काही शांत शांत व्हावे हीच प्रागतिक समाजाची लक्षणे समजावीत का नाही?

राजकीय क्षेत्रात प्रश्न उपस्थित न करता 'राजा वाक्यं प्रमाणं' ची संथा देणाऱ्या या संत महंतापुढे त्यामुळे सत्ताधीश ही नतमस्तक होत असतील तर तो या सर्व सत्ताधारी नेतेगणांच्या मनाचा मोठेपणा मानावयास हवा.

आता राहता राहिले काही सुधारणावादी चिंतातुर जंतू. यांचा काविळी उन्माद असा की यांना सगळीकडे जग पिवळेच दिसते. त्यांना बाबा नि बुवांनी मनुष्याच्या आयुष्यातले सोडवलेले प्रश्न दिसत नाहीत. तर त्यात फक्त पैशांची देवाणघेवाण दिसते. किती हे धनकेंद्रित क्षुद्र विचारसरणीचे लोक! यांचा आक्षेप काय? तर लोक यांच्या नादी लागतात. भजनी लागतात. आता एखाद्या स्वामी किंवा साधुपुरूषाच्या नाम स्मरणाचा नाद लागला अथवा त्याच्या भजनाच्या नादात कुणी गुंग झाला तर ही भक्तीची परिसीमा हे ही ह्यांच्या ध्यानी येऊ नये? हे तथाकथित शिक्षित यास अंधश्रद्धा काय म्हणतील, नादी लागणे काय म्हणतील.. म्हणोत बापडे. यांच्या नादी न लागावे हेच शहाणपण. प्रश्न न विचारता बाबा नि बुवांच्या मागे जाणे यास गतानुगतिकता म्हणण्यासारखा करंटेपणा नाही हे यांना कोण समजावणार? समाजातील शंभर पैकी ऐंशी एत्तदेशीय अशा बाबा बुवांचरणी लीन होणारे असतील तर या तथाकथित स्वयंघोषित समाज सुधारणावाद्यांस विचारतो कोण? जगाच्या अकल्याणा या सुधारकांची भुते.. हे जाणून त्यांकडे दुर्लक्ष करावे हेच श्रेयस्कर. या सुधारणावाद्यांकडे रीतसर दुर्लक्ष करणे, जर त्यांची सद्दी वाढताना दिसली तर त्यांस बदनाम करून सोडणे, धर्मद्रोह व देशद्रोह अशा आरोपांच्या जंजाळात अडकविणे अशा त्रिसूत्रीने अशा सुधारणावाद्यांचा बंदोबस्त करणे कठीण जाऊ नये. समाजाच्या अंतिम हिताकरिता संतमहंतांच्या विभूतीच महत्वपूर्ण असल्याने त्यांस विरोध करणाऱ्या ह्या जमातीचा आवाज कितीही क्षीण असो, त्याचा बंदोबस्त समूळ केल्यास पुढील अनर्थ टाळता येऊ शकतो. साधु, संत,

नेतेगण यांच्या भक्तीमार्गी तल्लीन समाज निर्मितीत या सारख्या द्रोही पाखंड्यांचा अडसर येऊ न देणे किती आवश्यक आहे हे आम्ही सांगावे असे नाही.

सरतेशेवटी एकच, भोंदूमय सत्पुरुषांच्या मांदियाळीत तोचि साधु कसा ओळखावा? तुकाराम महाराजांच्या काळातील कसोटी काळानुरूप बदलताना जे का रंजले गांजले त्यांस आपले म्हणणारा तो साधु ही अति सुलभ व्याख्या आज लागू पडत नाही, तुकाराम महाराजांचे मोठेपण मान्य करून देखील. तुकाराम, एकनाथ, ज्ञानेश्वर, गाडगेबाबा, तुकडोजी महाराजादि सर्व संतांचा मोठेपणा मान्य करता करता त्यांच्या शिकवणुकीस कालानुरूप बदलत जाणे आवश्यक आहे असे एका सांप्रत कालीन संत शिरोमणींचे म्हणणे अयोग्य कसे असेल? हे संत शिरोमणी श्री श्री अवगुणानंदबुवा महाराज एका अभंगात म्हणतात,

ज्यास पडती न सवाल । जो पडतसे पाया
उगा वेळ न दवडे वाया । तोचि खरा भक्त ।।

बाबा बुवा दावित । पंथ भक्तीचाचि
तेथे सवालांचि । काय जरूरी?

खऱ्या भक्तांस न । कमी भेटतील साधु
करिती ते जादू । ऐसे जाणा ।।

खऱ्या भक्तासि भेटे । तोचि खरा साधु
हेचि निर्विवादु । से जाणा ।।

साधुलागी लागे काही । धनधान्य संपत्ती
तीच त्यांची उत्पती । जाणाविच ।।

द्यावे धन वा कनक । ती स्वामीचीच संपत्ती
मग देखावी निष्पत्ती । आशीर्वचे ।।

उघडोनि दोन कर । उदार होऊन दान
त्यास न लहान सहान । मिळे वर ।।

साधु संत महंत बुवा । देती मोक्षाची हमी
तयालागी न कमी । पडो द्यावी ।।

मिटा बुद्धीची औजारे । मिटावेत डोळ कान
ऐसा ठेवावाचि मान । संतमहंतांचि ।।

जो दावितसे मार्ग । या जगी जाण्यास पुढेच
इतरा सोडुनि मागेच । तोचि साधु ।।

थोडक्यात काय, तर साधुसज्जन, संत महंत, बाबा बुवा अशा सत्पुरुषांची कमी या महाराष्ट्र देशी न होती, न आहे, न असेल. प्रश्न न पडणाऱ्या खऱ्याखुऱ्या भक्तांस हे खरे साधू भेटल्यावाचून कसे राहतील? उगाच सुधारणावादी बुद्धीभेद्यांच्या नादी न लागता बहुसंख्य भक्तगणांसारखे महाजनो येन गत: स पंथ: असे आचरण केल्यास सामान्य जनांचा उद्धार झाल्यावाचून राहणार नाही. खऱ्या भक्तांची नौका खरे साधुजनच भवसागरातून पार करून खरेच नेतील यात काय शंका?

# फेबु वरील सल्लेगारी ..



दिवस डिजिटल क्रांतीचे आहेत.. हे सारे आपल्या डोळ्यांदेखत घडलेले. म्हणजे काहीच वर्षांपूर्वी यातले काहीच नव्हते. म्हणजे काही वर्षांपूर्वी काळ्या फोनला जोडून एक वायर असायची म्हणे. लोक लायनीबियनी लावून फोनचा डबा घरी आणत. रस्त्यावर पब्लिक कॉल नामक नाणी गिळणारा डबा असे. तिथेही रांगा लागत. मग क्रांती घडली. दुनिया शब्दश: मुठीत आली. मोबाईलक्रांतीत सगळे सामील झाले. या अर्थाने आपण सारे क्रांतिकारकच! मग त्या मोबाईलचाही तोंडवळा बदलला. माणसं थोडी मंदबुद्धी असली तर चालतील पण मोबाईल मात्र स्मार्ट हवा.. तसा तो स्मार्ट होऊ लागला.

दिवसागणिक त्यात बदल झाले. इंटरनेटच्या जाळ्यात सारी दुनिया अलगद अडकली. अन्न, वस्त्र, निवारा यांसोबत इंटरनेटला जीवनावश्यक गोष्टीचा दर्जा मिळाला. आधी संगणकातील हे इंटरनेट, त्याने मोबाईलला जाळ्यात पकडले. नेट वाचून मोबाईल म्हणजे जणू पाण्यावाचून मासा. नेट आले नि मागोमाग गुगल नामक सर्वज्ञानी सर्च इंजिनाने जीवन पादाक्रांत करायला सुरूवात केली. त्याचबरोबर माणसाला व्यक्त होणे हे व्यक्ती म्हणून गरजेचे.. किंवा ज्यास व्यक्त होता येते.. तीच खरी व्यक्ती अशी नवी व्याख्या तयार झाली. नवनवीन चावड्या उघडू लागल्या .. आधी ऑरकूटावर मेतकूट जमायचे.. ते मागे पडले.. व्हाॅट्स्याप नि तत्सम काही आले. इन्स्टंट कम्युनिकेशनचा जमाना आला.. त्यातही फेसबुक नामक कुणी आपले तोंड उजळ माथ्याने या सगळ्यात घेऊन फिरू लागला. लोक फेसबुक नामक चेहरा नसलेल्या गोष्टीत अडकले. कधी न भेटलेले चेहरे फेसबुकावर फ्रेंड होऊ लागले. पण 'फ्रेंड इन डीड' व्हायला हवे तर हवी त्या वेळी हवी तशी मदत करणे गरजेचे .. आणि ज्यास मदत हवी तो तरी या आभासी मित्रांना सोडून कुणाच्या चेहऱ्याकडे पाहणार..

मी खूप दिवस यातून दूर होतो. कां? फेसलेस फेसबुकावरून कुणाशी मैत्री होऊ शकते हे कसे पटावे. पण माझा एक चेहरेवाला मित्र.. फेसबुक फ्रेंड नव्हे, तर खराखुरा चेहरा असलेला मित्र, रजनीकांत, तो मागे लागला.. म्हणाला "फेसबुकावर ये.. चांगले चार पाचशे मित्र जमव.. मग बघ कधी कुठला प्रश्न पडला की त्यास तत्काळ उत्तर मिळते की नाही?"

मला ते पटले नव्हते खरे, पण रजनीकांत नावातच काही जादू असावी. दाक्षिणात्य रजनीकांत सिनेमा नायक आहे तसा हा माझा हा मित्र नायकाहून कमी नाही. त्याचे म्हणणे ऐकणे भाग होते..

"तू काय कर ना.. आधी मित्र जमव नि मग बघ. टाक हवा तो प्रश्न नि बघ, उत्तर मिळतेच."

आता फेसबुकावरील इतर अनुभव हा अजून दुसऱ्या लेखाचा विषय होईल. तूर्तास मी आमच्या फेसबुकावरील सल्ले मिळवण्याच्या प्रथम हस्त अनुभवाबद्दल सांगणार आहे. प्रथम हस्त म्हणजे आंग्ल भाषेत फर्स्ट हँड.. हल्ली मी भाषा सुधार आणि परभाषीय शब्द हटाव मोहिम फेबुवर सुरू केली.. त्या बद्दल जास्त सांगत नाही .. कोणीतरी मी वापरलेले शब्द कसे फारसी, उर्दू वगैरे भाषेतून आयात केले गेले आहेत याबद्दल लिहिले याच फेबुवर.. माझा रोख खरा फक्त आंग्लभाषेवर होता.. असो. सध्या मी सर्वभाषा समभाव अंगीकारला आहे हे खरे..

तर मुद्द्याला हात घालतो.. मला तसे साधे प्रश्न पडतात .. ते फेबुवर टाकले की उदंड प्रतिसाद मिळतो.. 'वाचिता किती वाचशील दो नयनांनी' म्हणत मी ते वाचतो .. याच अनुभवांबद्दल मी सांगणार आहे. मला पडलेले काही प्रश्न अन् त्यास मिळालेला प्रतिसाद हेच मी लिहिणार आहे.. फक्त नावे वगळता. नावात काय आहे असे श्री.शेक्सपियर इंग्लंडकर सांगून गेलेत फार वर्षांपूर्वी त्यास

स्मरून. तर काही प्रश्न अन् त्यावरील काही उत्तरे .. सगळीच उत्तरे मी देत नाही विस्तार भयास्तव. काही उद्बोधक उत्तरे देत आहे..

पहिला माझा प्रश्न आणि नंतर त्यास फेबुवरून आलेली नमुनेदार उत्तरे :

मी सध्या १० कथा लिहिल्या आहेत. त्या प्रकाशित करण्यासाठी कोणी मार्गदर्शन करू शकेल काय?

१. करूच नका. लिहीत रहा फक्त.

२. करून टाका. उडवा बार आणि काय!

३. उजवून टाका. प्रकाशक नामक वराचे संशोधन आणि खरेखुरे वरसंशोधन यात फार फरक नाही बरे!

४. रद्दीचा भाव विचारून ठेवा.

५. बायकोची परमिशन घेतलीय ना? म्हणजे पुस्तकांचे गठ्ठे ठेवायची सोय आधी करा. नाहीतर तुम्हाला स्वतः घराबाहेर जायची वेळ यायची.

६. पैसे जास्त झालेत? पाठवून द्या.

७. मराठी भाषेची सेवा करण्याचे उदात्त व्रत असेच सुरू ठेवा.

८. आधी वाचन वाढवा. वाचनानंतर लिहा.

९. कथा लिहितात? खरेतर चरित्रे लिहा. उगाच काल्पनिक गोष्टींत मन रमवू नका.

१०. मला विचाराल तर या फंदात पडू नका. वाचक मिळेल का वाचक म्हणत फिरण्याची वेळ येईल.

११. लगेच व्हा पुढे. वाचक मिळोत वा न मिळोत. शारदेच्या दरबारात हजेरी लावणे महत्त्वाचे नि मानाचे ही..

मला वाटतं सरकारने गरीब वर्गास आर्थिक मदत केली पाहिजे. तुम्हाला काय वाटते?

१. व्हेरी नोबल थाॅट.. फ्राॅम अ नोबल पर्सन ..

२. गरीबी हटावचा नारा लावून दशकं ओलांडली. गरीबी तिथेच आहे अजून. गरीब हटाव बहुतेक सरकारी धोरण आहे.

३. उधळून टाकेन या भूमीच्या वरचा भार

अतिरिक्त ..

मी तयार आहे यायला परलोकी

अनभिषिक्त ..

४. नाटकात काम हवेय.. मला मेसेज करा..1234567890

५. नुस्त्या नोटा छापून वाटल्यातरी गरीबी हटेल. पण लक्षात कोण घेतो?

६. सरकार म्हणजे शेवटी कोण? तुम्ही आणि आम्हीच ना?

७. फार पूर्वी गरीबी हटाव सिनेमा आला होता. कुठं मिळू शकेल पहायला?

८. गरीबीची व्याख्या करायला श्रीमंत लोक फाइव्ह स्टारमध्ये जमतील. तेव्हा कुठे गरीबी म्हणजे काय ते माहिती पडेल. मग ती हटवण्याबद्दल विचार करता येईल.

९. कल्पनेची गरीबी की खरीखुरी? कलाक्षेत्रात पहिल्या प्रकारची खूप आहे.

१०. हो.

११. नको.

गाय छाप छत्री कुठे मिळेल कुणी सांगू शकेल का?

१. छत्री कशाला, रेनकोट वापरा. चिवट छाप रेनकोट साठी मला मेसेज करा.

२. बैल छाप चालेल?

३. छत्रसाल बुंदेला यांच्यावरील पुस्तक कुठे मिळेल काय?

४. घरपोच पुस्तकांसाठी संपर्क करा.. १२३४५६७८९०

५. छतरी न खोल उड जाएगी .. कुठल्या सिनेमातील आहे?

६. मुळीच घेऊ नका. खराब क्वालिटी. मी मागच्या वर्षी घेतलेली दुसऱ्याच दिवशी हरवली.

७. छत्रपती होऊ इच्छिता?

८. गायीचे काय घेऊन बसलायत? वाघ छाप इज द बेस्ट.

९. गाय छाप छत्र्यापण आहेत? मला वाटलं फक्त जर्दाच आहे.

१०. डोक्यावर छत्र हवेय? होलसेल छत्र्यांसाठी.. चामरे मात्र मिळणार नाहीत. आणि छत्र स्वतःच स्वतःवर पकडावे लागेल.

११. गाय छाप छत्रीवाले सगळे गौ आदमी की काय?

१२. ओह! व्हाॅट अ गाय!

आपल्या इथे बेस्ट जिलबी कुठे मिळेल?

१. शुगर चेक केलीय ना?

२. यू नो.. चकली म्हणजे तिखट जिलबी. जिलबी'ज डिस्टंट कझीन.

३. श्रीखंड खा. जिलबी कशाला? श्रीखंडाचा उल्लेख महाभारतातही आढळतो. आपल्या संस्कृतीशी इमान राखा.

४. घरच्याघरी रक्तातली साखर मोजा. ग्लुकोमीटर साठी संपर्क करा.. घरपोच डिलिव्हरी. अटी लागू.

५. अहो बायकोने जिलबी आणायला सांगितली असणार. उगाच श्रीखंड खा असले सल्ले देऊन घरात महाभारत घडवू नका.

६. मधुमेहासाठी हमखास आयुर्वेदिक इलाज. रोज एक चमचा पावडर घ्या. संपर्क करा..

७. जिलबी.. वाचूनच तोंडाला पाणी सुटले.

८. मधुमेह? मधु नामक व्यक्तीने काय करावे? नावातून मधु काढून टाकावे? मधुसुदन विल्बी प्लेन सुदन देन? आणि त्याला कधी झालाच तर नुस्ता मेह होईल?

९. नावात बदल करण्यासाठी गॅझेट मध्ये नोटीस. सर्व प्रकारची कायदेशीर मदत मिळेल. संपर्क करा.

१०. मधुमेह वगैरे नवीन फॅडं आहेत. आपल्या पूर्वजांना कधीच नव्हता तो डायबिटीस? उगाच औषधं खपवण्याची युक्ती. रोज एक कारल्याचा रस प्या. नो डायबिटीस.

११. अरे, त्यांना जिलबी कुठे मिळेल ते कुणीतरी सांगा की.

१२. घरच्या घरी कारल्याची लागवड कशी कराल? मोफत मार्गदर्शन. संपर्क.

मला एक सायकल घ्यायची आहे? कुठली आणि कुठून घेऊ? काही सजेशन्स?

१. डुक्कर ब्रँड.. बेस्ट. नाहीतर सरळ तिचाकी वापरा.

२. तुमचे नाव मायकल आहे म्हणून सायकल घ्यायची आहे? कुणी सांगितले मायकल तू सायकलपे आ.

३. सायकल बेस्ट. पेट्रोल नको. पेट्रोलचे भाव किती वाढलेत पाहिले ना?

४. मागच्या सरकारच्या चुकीची फळं आहेत ती.

५. मागचं सरकार जाऊन इतकी वर्ष झाली तरी त्यांना दोष देताय?

६. देशावर परकीय आक्रमण. सावधान रहा. आंतरराष्ट्रीय कारस्थान आहे सगळे.

७. 'कार'स्थान? प्रश्न सायकलचा आहे. कारचा नाही.

८. पंक्चरलेला.. या नावाचा एखादा सिनेमा काढायला हवा. झपाटलेला सारखा.

९. गाडीत स्टेपनी असते तशी सायकलीला पण असायला हवी.

१०. डब्बल सीट कोणाला घेऊन जायचा विचार आहे?

११. सायकल छाप अगरबत्ती. होलसेल भावात. सुगंधित देवभक्तीसाठी. संपर्क करा.

१२. घरच्या घरी पंक्चर काढा. पंक्चर कीट साठी संपर्क साधा.

दातदुखीसाठी कोणाला हमखास इलाज ठाऊक आहे का?

१. हातोडा.

२. भांडण कधी झालंय? यावेळी डाव्याबाजूला वाटते? उजव्याच्या वेळी केलेलात तोच इलाज करा.

३. लवंगाचे तेल. कापसाच्या बोळयावर घेऊन दुखणाऱ्या ठिकाणावर ठेवा. दातदुखी गायब.

४. काहीही करा पण डॉक्टरकडे जाऊ नका.

५. क्लोव्ह ऑईल इन होलसेल रेट.. ५ आणि १० लिटर कॅन उपलब्ध. संपर्क करा.

६. अर्धी वडी कापूर, विड्याची पाने देठवाली दोन, तीन लवंगा आणि अर्धा चमचा हळद. पाट्यावर वाटून घ्या. बारीक वाटून वरून मीठ टाका. त्याने दात घासा. आयुष्यात दात कधीच किडणार नाहीत.

७. मोठया आवाजात गाणी लावा. डोकेदुखी सुरू झाली की दातदुखी लक्षात येणार नाही.

८. बोकड छाप दंतमंजन. होलसेल भावात. संपर्क करा.

९. मोहनजोदडोतील सापडलेल्या सांगाड्यातील दात अजून शाबूत आहेत. काय वापरत असतील त्या काळी? आपल्या प्राचीन संस्कृतीचा अभिमान आपल्याला वाटायलाच हवा.

१०. होईल. बदल होईल. नवीन सरकार आपल्या उज्ज्वल भूतकाळाबद्दल अभिमान जागृती करेल.

११. उपटून टाका. न रहेगा दात न रहेगी दातदुखी.

१२. कोणता दुखतोय? वरचा की खालचा?

जवळच्या हाडवैद्याचा संपर्क कुणी देऊ शकेल काय?

१. कुठले हाड तुटलेय? जिभेचे का?

२. हाडवैद्य इज बेस्ट. डोन्ट व्हिजिट ऑर्थोपेडिक.

३. माझी पाठदुखी हाडवैद्याने गायब केली. त्याआधी कितीतरी गोळ्या खाल्ल्या असतील.

४. कर्जतच्या पुढे एका जंगलात झाडपाल्याचा लेप मिळतो तो लावा. ग्यारंटीड इलाज.

५. हाडाचा वैद्य.. तो हाडवैद्य?

६. मला वाटतं हाडांवर इलाज करणारा असा तो वैद्य अशी फोड होईल. तत्पुरूष समास?

७. बहुव्रीही.

८. कसला तत् पुरूष? पुरूष हाडवैद्याबद्दल सांगा की जरा.

९. पुरूष नाटक जुनं आहे? कुणी कुणी पाहिलंय?

१०. हाडाच्या आरोग्यासाठी कॅल्शिअमच्या गोळ्या. जेनेरिक कॅल्शिअम. हजार गोळ्यांचा पॅक. फक्त साडेतीन हजारात. घरपोच मोफत डिलिव्हरी. संपर्क करा.

११. अरे हाड..

१२. हाडवळे वैद्य. बेस्ट.

एकादशीला उपवासाला बटाट्याची भाजी चालते का?

१. हो

२. मुळीच नाही

३. आमच्याकडे चालते. सासरी नाही. मी म्हणून माहेरी जाऊन उपवास करते.

४. एकादशी दुप्पट खाशी.

५. आपणच आपल्या उपवासाची थट्टा करतो हे बरोबर नाही. मग इतर कोणी कशाला आपल्या व्रतवैकल्यांबद्दल आदर दाखवेल. आपला धर्म बुडणार अशा लोकांमुळे.

६. सुरणाची खा.

७. आपली व्रते आणि वैकल्ये. लेखक श्री. गजाननपंत गणपतराव नामजोशी किं.५५ र.५० पैसे फक्त. प्राचीन प्रकाशन. घरपोच डिलिव्हरी. पोस्टेज खर्च निराळा. संपर्क करा.

८. कुठली एकादशी यावर अवलंबून आहे. आणि तुम्ही देशावरचे की घाटावरचे?

९. शाबास! अजून तुम्ही एकादशी करता. मला अभिमान आहे. संस्कृती आणि धर्म अशानेच टिकून राहणार आहे. पुढील पिढीलाही शिकवा. सनातन धर्म हाच खरा.

१०. बटाट्याच्या भाजीची पाककृती. माझा लेटेस्ट व्हिडिओ पहा. यू ट्यूबवर. लिंक पाठवली आहे. लाइक करायला विसरू नका.

११. साल काढून की तशीच?

१२. सालातच सारी व्हिटामिन्स असतात म्हणे.

माझ्याकडे खूप सारी जुनी पुस्तके आहेत. कोणाला उपयोगी पडतील. हवी असल्यास सांगा.

१. आजकाल फक्त इ बुक्स ब्रो. सेव्ह पेपर

२. वीर महावीर जुना पेपर और भंगार मार्ट. घरसे सामान उठाया जाएगा. संपर्क करें.

३. इतकी जमवलीत कशाला? मोह वाईट. संचय करू नका. अपरिग्रह महत्त्वाचा. स्वामी सूर्यनारायणजी सत्पाळकर सांगून गेलेत. यापुढे लक्षात ठेवा.

४. घरपोच किराणा आणि घरगुती सामानासाठी संपर्क करा. त्वरित डिलिव्हरी. पाचशे रूपयांवरील ऑर्डरी मोफत पोहोचवल्या जातील.

५. वाचनालयात नेऊन द्या.

६. मला तर बाई पेपरची ॲलर्जी आहे. कोणत्या चांगल्या डॉक्टरचे नाव सुचवा.

७. तेरड्याची पाने रोज चावून खा. हमखास गुण येतो.

८. पत्ते खेळणाऱ्यांचा ग्रूप बनवायचा आहे, कोणाला इंट्रेस्ट असेल तर संपर्क करा.

९. तुळशी अंगणात लावल्याने जीवाणू घराजवळ फिरकत नाहीत. तुळस लावा. कृष्ण तुळस जास्त उपयोगी. पूर्वजांना सारे काही ठाऊक होते. म्हणून तर ते दीर्घायुषी होते.

१०. पुस्तके हाच आपला मित्र असे खूप मोठे लोक सांगून गेलेत.

आपल्याकडे जातीयवाद कधी संपेल असे वाटते का?

१. नाही.

२. कशाला संपवायचाय?

३. शतकानुशतके टिकून असलेली जातिव्यवस्था अशी नष्ट कशी होऊ देऊ आम्ही? आपल्या धर्मातील एकूणएक चालीरीतींमागे खोलवर विचार दडलेला आहे. आपली संस्कृती महान आहे आणि पुरातन ही.

४. असला प्रश्न कोणाला पडूच कसा शकतो?

५. नक्कीच तुम्हाला कोणी डाव्या विचारांचा चावलेला दिसतोय. आम्ही सांस्कृतिक पुनरूज्जीवनासाठी दिवसेंदिवस राबतोय आणि तुमच्या सारखे अशा प्रश्नांनी त्यावर पाणी फिरवताय? आमच्या पुढील आव्हानांचा अंदाज येतोय. तरी लोकाधार आहे आम्हाला म्हणून ठीक.

६. एकनाथांनी अस्पृश्यास पाणी पाजले म्हणतात. पण संतांची गोष्ट निराळी. आपली निराळी. उगाच संतबिंत मंडळींचे अनुकरण करून लहान तोंडी मोठा घास घेऊ नये.

७. जागेच्या व्यवहारासाठी जे.के.इस्टेट एजन्सी. एकमात्र विश्वसनीय.

८. प्रश्न काय आणि लिहितात काय?

९. मूळ प्रश्नापेक्षा जागेचे व्यवहार बरे.. खरेतर प्रत्येकास आपली पायरी ठाऊक असणे नि जागा दाखवून देणे महत्त्वाचे. त्यामुळे इस्टेट एजन्सी बद्दल लिहिण्यात काव्यगत न्याय आहेच.

१०. साधा आणि काव्यगत न्याय यात काय फरक असतो?

हे सारे वानगीदाखल. अजूनही उद्बोधक उदाहरणे आहेत. सामान्य अन असामान्य ज्ञानाची गंगाच जणू वाहते आहे. आपणही आजच सामील व्हा नि ज्ञानगंगेत न्हाऊन निघा. सल्ला कुठून नि कसा मिळेल ते थोडीच सांगता येतेय? वेळ जशी सांगून येत नसते तसे सल्ले ही असे अनाहूतपणे मिळत असतात. क्रांतिकारक आपणच. ही नवीन डिजिटल सल्लाक्रांती.. आपण नाहीतर कोण या क्रांतीचा भाग होणार?

# एक पाल्-हाळ!



सॉरी. चुकले मी.

चुकून चुकचुकले मी.

तशी भिंतीवरून सरपटत जाताना मी आवाज म्हणून करत नाही. माझ्या पायांत निर्वात गाद्या लावल्यात त्यामुळे मी छतावर उलटी धावते. भिंतीवर सरळ चढते.. कुठे आवाज नाही की काही नाही. हूं की चूं नाही.

मग मी इतकी शहाणी असून असे का घडले..

अन अशी कशी मी चकले अन चुकून चुक चुकचुकले?

काय आहे आम्हा पालींच्या जमातीत फारच कडक नियम हो. मिस्टर पाल बिनधास्त फिरतील.. आणि आम्ही पाली? जरा कुठे सांदी कपाऱ्यात शिरलो की श्रीयुत पाल चुकचुक करत करवादणार. आमच्यातही ती खाप पंचायत बसली की आली ना पंचाईत. तिच्यापुढे कुणाचे चालणार? अगदी उदारमतवादी श्रीयुत पाल असले तरी त्यांचे अशा ठिकाणी काय चालणारे? मग शेपटी तोडण्यासारख्या अपालीय शिक्षा देतात. आमच्या पालीच्या जातीचे भोग आणि काय?

तशी आमची पालीची जात मागासच म्हणा. म्हणजे पाल कशी गोरीपान पांढरी फटकच हवी.. त्यात पांढरी फटक ही नुसत्या पांढरेपणाहून जास्त सौंदर्याचे लक्षण. मग त्यात काही असतात थोड्या मळक्या काळसर राखाडी वगैरे.. अशा पाली जन्मल्या की आईबापांची चुकचूक सुरू होते. अशांचे आयुष्य जायचे कसे? यांना कोण मिस्टर पाल पसंत करणार? पण बिचाऱ्या तशाच आयुष्य कंठतात. आता हा रंग नि रूप सृष्टी निर्माता देऊन पाठवतो.. आमच्या नसलेल्या ललाटावर भाग्यरेषा वगैरे असते तिच्यावर सारे आयुष्याचे सार लिहिले असते. त्यात काही उलटे दान पडले की पालीच्या आयुष्यात एकाकीपण ठरलेलेच.

खरं सांगते, तशी आम्हा पालींना एकाकीपणाची सवयच असते. बाकी प्राणी कसे कळपाने राहतात. आम्ही नाही. एका पालीस दुसरी भेटली नि दोन्ही गप्पा छाटत बसल्यात असे दिसलेय कुणाला? अगदी मुंग्या पण एकमेकांची खबरबात विचारून पुढे सरकतात. मच्छर वगैरे रात्री गुं गुं गाणी गात डान्स वगैरे

करत मस्त एन्जाॅय करतात. माश्या कश्या थव्याथव्याने विहरत असतात. निशाचर म्हणावीत अशी झुरळे पण घराघरातून एकामागून एक संख्या वाढवत झुरळ साम्राज्य स्थापन करतात. पण आम्ही?

रात्री आम्ही निघालो जिभेने कीडे पकडायला तेव्हा बघतो ना सारे कीडे आणि त्यांचे गणगोत.. नि त्यासमोर आम्ही.. एकाकी. तशी आम्हा पालींच्या नशिबी ही नाइट ड्यूटी लागलीय ती लागलीच. रात्रभर कीडे गटकवा नि दिवसभर शांतपणे कुठेतरी लपून बसा. काय आयुष्य आहे!

आम्हाला पण मग प्रश्न पडतो मध्ये मध्ये. काय असेल पालीच्या आयुष्याचा अर्थ? जीवनाचे भागधेय ते काय? या पृथ्वीतलावर पालजन्म मिळणे आमच्यात महद् भाग्य समजतात. पण मग या जन्माचे सार्थक कशात आहे?

या माणसांच्या जंगलात आम्हा पालींच्या जातीचे फार काही कौतुक नाही कोणालाही. चुकून त्यांनी एका भाषेला पाली नाव दिले असेल पण म्हणून काही त्यांना आम्ही आवडतो असे काही नाही. उलट आमचे चुकचुकणे ऐकले की त्यांना काहीतरी चुकणार आहे असे वाटते. योग्यायोग्यतेच्या नि चांगल्या वाईटाच्या संकल्पना अगदीच वेडगळ आहेत त्यांच्या. अर्थात आमच्यात आहे तशी खाप पंचायत त्यांच्यात ही आहे म्हणे! म्हणजे आमच्या पालींमध्ये ऐकावे ते नवलच म्हणून सांगायला गोष्ट चांगलीय ही! अर्थात तशा आम्ही पाली कधी एकत्र भेटलो तर नि बोललो तर!

आणि तसे आम्हाला बोलता येत नाही म्हणून, नाहीतर कानाकोपऱ्यातून आम्ही या माणसाबद्दल काय काय बघतो ते सांगत सुटलो तर हा मनुष्य प्राणी तर आमच्या खाप पंचायतीहूनही निष्ठुरपणे आम्हाला शिक्षा देईल. त्यामुळे ते एक बरं आहे. पृथ्वीवर माणूस आणि त्याबाहेर देव सर्वशक्तिमान आहेत असा त्या माणसाचा समज आहे.. त्यामुळे त्याच्यापासून दोन हात दूर राहिलेलंच बरं आणि काय?

तुम्हाला सांगू, त्यादिवशी गंमत झाली. एके ठिकाणी एका घरात मी खूप दिवस राहून कंटाळलेले. घर कसलं, कोंडवाडा. खिडक्या बंद, दरवाजे बंद. खायला प्यायला चंगळ, कारण कीडे भरपूर, पण प्राणी काय फक्त अन्नावर जगतात? काहीतरी झाले, दरवाजा किलकिला पाहून मी त्या घरातून धूम ठोकली. बाहेर रम्य जग खुणावत होते. एक दोन रात्री त्या उघड्यावरील भिंतीवर काढल्या. मग कंटाळा आला. त्याच भिंतीवर कितीकाळ काढणार?

मग एका उघड्या खिडकीतून दुसऱ्या एका घरात शिरले.. घर तसं चांगलं. लोकं बोलत होती पण भांडत नव्हती .. मी दरवाजामागे.. दरवाजावरची घंटी वाजली..

बाहेरून आवाज आला..

मि.पाल हैं?

तुम्हाला सांगते, इतकी वर्षे झाली पण यांना कधी कुणी मिस्टर पाल म्हणून हाक मारली नव्हती .. आज प्रथमच कुणी असे म्हणताना ऐकले. आता माझ्या

पाठोपाठ हे कुठे येतात? ते दिवस गेले. म्हणजे लग्नाआधी माझ्या पाठी गोंडा घोळणारे हे आता सटीसहामाशी भेटतात. ते इकडे कुठून येणार? मला आश्चर्य वाटेपर्यंत घरातून एक मोठा माणूस येऊन उभा राहिला ..

गंमत म्हणजे त्याचे नाव मिस्टर पाल होते!

उगाच गंमत म्हणून वाटले, खूप दिवसांपूर्वी एका घरात मुक्काम होता तेव्हा तिकडे लहान मुलास गोष्ट सांगायचे, त्यात कुणी माणूस कुणाच्या शापाने नाहीतर जादूने प्राणी बनायचा.. आता यांना कुणी जादूने माणूस तर नाही ना बनवले?

ही आपली एक गंमत.

तर आता या नवीन घरात छतावर नि भिंतीवर लटकते मी. डास नि कीडे तसे बरे मिळतात. विशेष म्हणजे घरातील लोक त्यांच्या नावामुळे की काय, तसे पालस्नेही आहेत. म्हणजे इतक्या घरांत मी गेलेय.. बहुतेक ठिकाणी मी दिसले की लागतात झाडू घेऊन मागे. जशी काय मी चावणारच आहे कोणाला! कधी एकदा घरातून हाकलवतात मला असे होते त्यांना. तशी मी चिवट. कशाच्याही मागे मी कितीही कोणी मागे लागले तरी लपून राहू शकते.. पण हे पाल कुटुंब वसुधैव कुटुंब का काहीतरी म्हणतात तसे असावे. कारण मला पाहून ना कुणी झाडू घेऊन आले ना काठी.. मला तर आश्चर्य वाटले.. खरंच तर हे कुणाचा शाप मिळून मिस्टर पाल म्हणून राहात तर नाहीत ना? आता मी इथे रूळलेय. कुणाच्या घरात पाळीव कुत्रा मांजर असावीत तशी पालांच्या घरची मी पाळीव पाल झालेय. खुशाल मी घरभर फिरते. बहुधा रात्रीच. आजवर कुणी मागे लागून

मला घराबाहेर नाही हाकलवले. पण माणूस प्राण्याचा कसा देणार भरवसा? आज असा तर उद्या तसा. त्यामुळे रात्री बाहेर पडते, दिवसभर एका खोलीच्या कपाटामागे शांतपणे निद्रिस्त राहते. दिवस मजेत चाललेयत.. कुणी मिस्टर पाल म्हणून हाक मारली की तशी क्षणभर यांची आठवण येते, पण क्षणभरच. कारण पालीजन्मा ही तुझी कहाणी हे मला ठाऊक आहेच.

तर आजवरची ही माझी जीवन कहाणी. सगळे काही पाल्हाळ लावत नाही मी. उगाच माझ्याच तुटलेल्या शेपटासारखी वळवळत का ठेवा गोष्ट? नाही, आता नाही. ती गोष्ट जुनी. जुन्या घरात झाडूचा मार लागून तुटलेली शेपटी. आता ती जखम भरून निघालीय.. असू देत. पाल्-हाळ लावणं पालीच्या जातीला शोभत असेल पण मला नाही जमत. तेव्हा सुचेल तसे सांगत बसले. आता पुरे!

.. आता परत जाऊन झोपते पालांच्या कपाटामागे..

# काहीतरी 'ऑरगॅनिक'!

जमाना ऑरगॅनिकचा आहे म्हणे!

म्हणजे हल्ली कुठल्याही दुकानात जा, ऑरगॅनिक म्हणून लेबल लावून अन्नपदार्थ मिळतात. मूळ पदार्थापेक्षा दुपटीने महाग असणे ही ओळख त्यांची. कित्येक लबाड दुकानदार तर आडवळणाने भाव वाढवायला साधेच ना◌ॅन ऑरगॅनिक पदार्थ ऑरगॅनिकत्वाचे लेबल लावून विकत असावेत. पण आपला तो विषय नाही. मागे संगीत नाटकांतून मोठ मोठा ऑर्गन वाजत असे. अशा ऑरगॅनिक संगीतावर नाटकं गाजत असत. आताच्या जमान्यास अनुसरून मोठा ऑर्गन जाऊन माऊथ ऑर्गन आला! खिशात मावेल असा. त्याच्यावरही गाणी वाजवता येतात. पण आपला विषय तो ही नाही! आपला विषय आहे तो शारीर अवयवांचा. वेगवेगळे अवयव म्हणजे ऑर्गन्स. शरीरशास्त्राच्या नियमानुसार आपापली कामे बजावणारे. त्यांनी आपापली कामे करावीत.. आपण त्यात का नाक खुपसावे? त्या उलट डोळसपणे पाहात बसावे नि त्याबद्दल कानोकानी खबर पसरवावी! उगाच कुणाच्या पोटात दुखायला नको! वेगवेगळ्या अवयवांना भाषिक मान मिळायलाच हवा!

१.

नाकावर टिच्चून!

नारायण कमलाकर नाकाडे.

म्हणजे ना.क.नाकाडे.

उगाच नाकाम म्हणून बदनाम.

लोक नाक मुरडत त्याच्यापासून चार हात दूर राहात. उगाच त्याच्याबद्दल काहीबाही बोलून नाक वेंगाडत. नको तिथे नाक खुपसण्याची सवय लोकांची. ना.क.नाकाडे करणार काय? आपण हसे लोका, शेंबूड आपल्या नाका हे लोकांना कळतेय थोडीच? लोकांनी नाकात दम आणलेला. पण नाकाडे आपले नाक नकटे असले नि या लोकांनी नाकी नऊ आणले तरी नाक थोडीच घासणार होता? लोकं काय नाकाने कांदे सोलतात. कुणी नक्राश्रू ढाळतात. पण या सर्वांच्या नाकावर टिच्चून नाकाडेचे सूत नकुलशी जुळलेच. नाकेल्या नाकाडेचे नकचढी मानल्या गेलेल्या नकुलशी जुळू नये म्हणून नाही नाही ते प्रयत्न लोकांनी केलेच. नाकातोंडाशी आलेला घास निघून जातो की काय असे नाकाडेला वाटले. उगाच आपले नाक कापले जाईल की काय अशी भीती वाटली. पण शेवटी लोकांच्या नाकावर टिच्चून तिच्या नाकदुऱ्या काढत नकुलशी जोडी जमवलीच. नाकासमोर पाहून चालणारा नाकाडे नकुलला आवडला. त्यांची जोडी जमलेली पाहून लोकांच्या नाकाला मिरच्या काय झोंबल्या, बरे नाक ठेचले नि नाकावर पाडले त्यांना असे नाकाडेला वाटले. लोकांचे काय? नाक दाबले तरी तोंड न उघडता नि नाक मुठीत न धरता म्हणाले,

ती नकुल? नाकापेक्षा मोती जड! शेवटी काय.. लोकांचे म्हणणे हेच.. पडलो तरी नाक वर! होय की नाही?

२.

## मान मोडून!

मांडी ठोकून नि मान मोडून काम केल्याने मानकरांची मान दुखायला लागली. त्यामुळे ते प्रचारास न गेल्याने मानहानी झाली असती. पण मानकर हुशार. मानभावीपणे मानकर माने हाॅस्पिटलात पोहोचले.. आणि म्हणाले, 'मान या न मान मैं तुम्हारा मेहमान.' डॉ माने करणार काय.. मानगूट पकडून मानकरांना बाहेर करू म्हणावे तर मानकर म्हणजे मोठे माननीय गृहस्थ.. असे काही करावे तर मानकरांचा अपमान व्हायचा. "मानकर, मानवाच्या मानेत सात हाडे असतात.. एखाद्यास मानवत नाही खूप काम. तुम्ही माना मी सांगतो ते, विश्रांती घ्या.."

वेळ निवडणूकीची. मान अपमान विसरून कामाची. पण मानकर करतात काय.. सल्ला मानून तसे पक्षश्रेष्ठी मानेवर जू ठेऊन काम करवून घेणारे. पण सल्ला मानून विश्रांती घेणे भाग..

मग त्यांच्या विरोधकांचा फोन आला, "डॉक्टर माने, मान गये उस्ताद. मानकरांना बसवले घरी!"

३.

कशासाठी पोटासाठी ..

"पोट्टयांनो, सगळया गोष्टींतले पोटभेद शिकून घ्या. परीक्षेत येतील.. आणि योग्य तिथे पोटफोड्या ष वापरा." पोटेगुरूजी मुलांना पोटतिडिकेने व्याकरण शिकवत असतात. "पोटापुरता पसा पाहिजे सांगून गेलेत संतमहंत. तेव्हा पोटापुरतं तरी कमवा नि त्यासाठी शिका.. तेव्हा पोट भरू शकाल.."

पोटे गुरुजींचा वर्ग म्हटले की पोरांच्या पोटात गोळा येई. एकतर मधल्या सुटी आधी पिरीयड आणि त्यात पोटमाळयावर भरणारा वर्ग. इकडे पोरांच्या पोटात कावळे कोकलत असत. मग कुणी पोटात कळा यायचे नाटक करून बाहेर पडे. "मुलांनो, अशा कळा आल्या पोटात तर चालतील, पण कोणाचे भले झाले म्हणून पोटात दुखवून घेऊ नका." पोटे गुरूजी पोटभर उपदेश करत.

गुरुजींच्या पोटात मात्र तशी माया होती. पोटाला चिमटा घेऊन ते गरजूंना मदत करत. पोरांच्या पोटात शिरून त्यांच्या समस्या समजावून घेत. पोरंच ती चुकायचीच. पण हातावर पोट असलेल्या, पोट पाठीस लागेल इतके खपाटीला गेलेल्या आईबापांच्या घरातली पोरं सगळी. पोरांच्या चुका मोठ्या मनाने पोटात घालत पोटे गुरूजी पोरांना पोटाशी घेत. अर्थात पोरांच्या घरातून कोणी

बोलावले तरी येत नसे. एक दिवसाचा खाडा केला तर पोटावर पाय येईल अशी परिस्थिती, पोटे गुरूजींना दिसत होतीच.

अशातून पुढे आलेला पोपट, त्यांचा आवडता विद्यार्थी. खूप वर्षांनी पोटापाण्याचा व्यवसाय शोधताना भेटला त्यांना.

"पोटे सर, तुम्ही? मी पोपट .."

"ओळखले रे पोट्ट्या.. कसा आहेस?"

"कशासाठी पोटासाठी म्हणत फिरतोय. नोकरी मिळालेली, पण मालकाने कमी केले. पोटावर नका मारू म्हणालो, पण त्याचे न हृदय द्रवले न आतडे तुटले.."

"तुम्हा पोट्ट्यांची काळजी रे मला.." गुरूजी पोटतिडिकेनं म्हणाले.

"तुम्ही होतात म्हणून पोटतिडकीनं शिकवायचेत. बाहेर जग पोटभरू सगळे, गुरूजी तुम्हीच एक पोटेसर बाहेर सारेच अप्पलपोटे.."

इतक्या वर्षांनी शाळेतल्या पोट्ट्याने हे म्हणून दाखवावे.. पोटे गुरुजींच्या पोटात माया दाटून आली..

४.

कानगोष्ट!

कानावर कसला आवाज आला नि श्री.कानविंदेंनी कान टवकारून कानोसा घेतला. तसा काही कानठळ्या बसाव्यात असा आवाज नव्हता. कान तसे तिखट त्यांचे. कानन कानविंदे म्हणजे श्रीमती कानविंदेंना कोणी कानामागून येऊन तिखट झाल्याचे आवडत नाही. त्यात तशा त्या हलक्या कानाच्या. त्यामुळे कान्ताबाई कान्दळगावकरांच्या प्रमोशनची बातमी कानावर पडली नि काननबाई किंचाळल्या. श्री.कानविंदेंना तशी काननबाईंची सवय माहिती होतीच, तरीही ते किंचाळणे कानाला खटकलेच त्यांच्या. अर्थात काननला सांगून फायदा नाही, कानन या कानाने ऐकून दुसऱ्या कानातून सोडून देईल हे त्यांना इतक्या काळात ठाऊक होते. तिचे कान उपटावे तर इतकी हिंमत त्यांच्यात नव्हती. आणि तिला काही कानपिचक्या दिल्या तर कानन कान किटेपर्यंत कटकट करणार, मग कानात बोटे घालून दिवसभर बसावे लागायचे. वर काननबाई सगळ्याबद्दल कानविंदेंना दोष देऊ लागल्या की कानावर हात ठेवायची पाळी यायची. नि कदाचित कान पकडून न केलेल्या चुकीची माफी मागावी लागायची. त्यापेक्षा कान पाडून गप्प राहणे श्रेयस्कर म्हणून ते गप्पच बसले.

पाठोपाठ श्रीमती कानेटकरांचा फोन आला. कानेटकरबाई म्हणजे काननबाईंच्या कनिष्ठ, पण कान्तांबाईंच्या विरोधी. अगदी फोनवरही बोलताना फोनला ही कान असतात समजून कानात खुसूखुसू बोलणाऱ्या. मग कानोकानी ऐकलेल्या बातम्यांची देवाणघेवाण झाली. काही वेळानी काननबाई शांत

झाल्या. कानविंदेंनी कानात घातलेली बोटे बाहेर काढली नि कानननी समोर ठेवलेल्या चहाच्या कपाचा कान पकडून चहाचे घुटके घ्यायला सुरूवात केली..

५.

अ.

एक डोळस संवाद

मि.डोळे मिसेस डोळेंच्या डोळयात डोळे घालून बघत होते. मिसेस डोळे यांनी डोळे वटारले, म्हणाल्या, "मि.डोळे वयाचा तरी विचार करा." मि.डोळे यावर हसले आणि डोळा मारत उत्तरले, "आपले दोनाचे चार डोळे कधीच झाले, कॉलेजात असतानाच माझा तुझ्यावर डोळा होता." त्यावर मिसेस डोळे डोळे विस्फारून पाहू लागल्या. "खरंच, तेव्हा तुझ्या विचारात माझ्या डोळयाला डोळा लागत नसे. तुला डोळा भरून पाहात असे कट्ट्यावर तेव्हा कुठे डोळे निवत असत."

"तुम्हाला काय वाटले माझ्या डोळयात ते आले नव्हते. मी पण काणा डोळा करायची.." मिसेस डोळे डोळयांच्या पापण्या लवलवत म्हणाल्या.

"खोटं सांगतेस.. मी तुझ्या डोळयांत भरलो होतो.. म्हणून तर घरच्यांचा डोळा चुकवून तू भेटायला यायचीस."

"ते वयच तसं असतं मि.डोळे. डोळे मिटून निर्णय घ्यायचे. आता डोळे उघडले."

"परत खोटे! मिसेस डोळे, तेव्हा तुम्ही माझ्या वाटेकडे डोळे लावून बसायच्च्यात. मला पाहिले की तुझे डोळे लकलकायचे."

"काहीतरीच मि.डोळे. ते माझे नशीब.. म्हणून डोळे पाणवायचे इतकेच!"

"असं म्हणता मिसेस डोळे? आता तुमच्या बोलण्याकडे काना डोळा करायची माझी पाळी. पण माझे गुण पाहशील तर डोळे पांढरे होतील."

"मि.डोळे.. काय झाले की तेव्हा डोळयांवर झापडे बांधलेली मी. आता डोळे मिटेन तेव्हाच सुटका व्हायची."

ब.

आजोबांचे डोळे

आजोबांचा डोळा लागलेला पाहून तो बाहेर पडला. नाहीतर त्यांचा डोळा चुकवून जायचं कसं याचाच घोर त्याला लागायचा. आजोबा तरी काय करणार, त्याच्या काळजीने त्यांचा डोळयाला डोळा लागायचा नाही. पोराकडे डोळेझाक करावी वा डोळयावर कातडं ओढून बसावं नि पोरानं काही केलं तर डोळे पांढरे व्हायची वेळ यायची. पोरगा डोळयात धूळ तर फेकत नाही ना? डोळे मिटून दूध पिणाऱ्या मांजरीसारखा हा साळसूद तर नाही ना?

पण पोराला काय?

त्यांचा डोळा लागला नि हा तिच्या वाटेकडे डोळे लावून बसला कट्ट्यावर. तिला पाहून तिच्यावर डोळे खिळलेले. प्रथम डोळे फाडून पाहिलेलं.. आता तिला डोळे भरून पाहू..

ती होतीच नाकीडोळी नीटस. तिला कुणी डोळा मारलेला त्याला खपत नसे. म्हणून तर डोळयात प्राण आणून तिची वाट पाहात तो बसलेला असे, अगदी डोळयांत तेल घालून आणि कुणाच्या डोळयांना खुपलं तरी त्याची पर्वा न करता. डोळे टक्क उघडे ठेऊन तो बसायचा, कुठे डोळयांची पापणी लवते न लवते, आणि ती डोळयांआड झाली तर? ती डोळयांच्या पापण्या पिटपिट मिटत उघडत येईल.. तिच्या डोळयांत डोळे घालून आपण बसलेलो आहोत.. असली स्वप्नं डोळयांपुढे आणत.

पण आज आक्रित घडलं, मिटलेले डोळे उघडले नि तो घरात नाही पाहून आजोबाच कट्ट्यावर आले, त्यांचे वटारलेले डोळे तो डोळे विस्फारून पाहातच राहिला..

"गाढवा डोळयात धूळ फेकतोस की काय? की डोळे फिरले तुझे?"

तो आजोबांच्या डोळयाला डोळे भिडवणार कसा? जणू डोळे मिटून तो त्यांच्याबरोबर निघाला, नि ती येताना दिसली. तिचे डोळे लाल लाल का? तिला विचारावे, राणी तुझ्या डोळयांत पाणी? की तिचे डोळे आले असतील? आजोबांचा डोळा चुकवून तिला डोळे भरून पाहात तो घरी पोहोचला..

भरून आलेले डोळे पुसत आजोबा बोलत होते, "माझे हाल पाहतोयस ना भगवंता? की डोळे फुटलेत? आईबापाविना पोर, डोळ्यात तेल घालून वाढवलं.. डोळ्यांच्या खाचा झाल्या.. तू माझ्या डोळ्यांपुढे रहा.. काहीतरी करून दाखव असं की डोळे दीपून जावेत."

त्यांच्या डोळ्यातले पाणी पाहून जसे त्याचे डोळे उघडले. आजोबांच्या डोळ्याला डोळा भिडवत तो म्हणाला, "तुम्ही माझ्या डोळ्यांत अंजन घातलंत. असं काही करेन की तुमच्या डोळ्यांचे पारणे फिटेल.."

आजोबांचे डोळे त्याच्यावर खिळले.

"डोळ्यांत प्राण आणून त्या दिवसाची वाट पाहातोय रे.. मग मी डोळे मिटायला मोकळा.."

ह्या विविध ऑर्गन्सच्या 'ऑरगॅनिक' लघुकथा! इतरही अवयव रांगेत आहेत. त्यांच्यासाठी कंबर कसून किंवा अगदी ऊर फोडून गळ्यापर्यंत येण्याच्या आत लिहिण्याच्या कामाला लागले पाहिजे. ते सारे अंगावर आले तर तोंडघशी पडायला व्हायचे नि नसतीच डोकेदुखी व्हायची!

तोवर ह्या वाचा पोटभर नि रवंथ करा.

# राजूकाकाच्या ’काका’पणाची गोष्ट

राजूकाकाच्या घरी गेलो तर तो लोळत पडलेला होता. त्याचे खरे नाव राजू नाही. आणि तो माझाच नव्हे तर कोणाचाच काकाही नाही. त्याचे कागदोपत्री नाव मांगरीश. त्यावरून त्याचे नाव मंगू, मंग्या किंवा मंगरू पडायचे. कोणी त्याला मॅंग्स म्हणू शकले असते. पण त्याचे राजू हे नाव कसे पडले हे कोणालाच माहित नाही. मात्र तो आमच्या आळेकरवाडीतला सार्वजनिक काका कसा झाला याचा इतिहास मात्र ज्ञात आहे. त्याचे केस अकाली पांढरे झाले. आणि लोक त्याला काका म्हणू लागले. वास्तविक आम्ही जवळजवळ सारख्याच वयाचे. माझा काका वर्गात प्रवेश हल्लीच झाला. पण राजूचा 'काका' मात्र खूप आधीच झालेला. खरे तर कॉलेजात बाकी मुले त्याला आजोबाच म्हणायचे. पण वाडीतले लोक दयाळू असल्याने त्याला आजोबापणापेक्षा काकात्व बहाल केले गेले. अर्थात राजूला नाना म्हणा की खापरपणजोबा म्हणा राजूला त्याचे काही नाही.

"Rose by any other name will be a rose. So this Mangarish will be Mangrish. नावात काय आहे?"

हाच त्याचा युक्तिवाद असायचा.

त्याला त्याचे खरे नाव आठवते याचेच मला आश्चर्य वाटले. बाळू नावाचा एखादा जख्खड म्हातारा असू शकतो. आणि बेबी नावाची एखादी आजी असू

शकते. यावरून आमचे चांगलेच वाद व्हायचे. थोडे विषयांतर करून सांगायला हरकत नसावी. एकदा या नावात काय आहे ला उत्तर म्हणून मी काही तरी लिहीले आणि तो कागद त्याच्या हातात ठेवला.

"वाच हे कसे वाटतंय ते."

गबाळग्रंथी टेलर बकालपुरातील खूपच प्रसिद्ध टेलर. मोठे मोठे लोक त्याच्या कडून कपडे शिवून घेत असतात. दु:शासनांनी यावेळी ठरविले होते की कपडे शिवायचे ते गबाळग्रंथींकडूनच. त्यासाठी त्यांनी कित्येक महिने बचत केली होती. आपले शर्ट-पॅंट घेऊन ते घरी आले. त्यांची पत्नी चुगली वाटच पाहात होती.

घरातील शांतता पाहून त्यांनी विचारले, ’पोरे कुठायत?’

चुगली म्हणाली, ’निर्बुद्ध गेलाय फुटबॉल ट्रेनिंगला आणि दुर्बोध हिंदीच्या क्लासला.’

’हिंदीचा नवीन क्लास?’

’हो ना, तिकडे वाकडे गुरूजी घेतात हिंदी ट्यूशन्स.’

’आणि मुंगी?’

’ती गेलीय तिच्या मैत्रीणी कडे,’

’कोणाकडे? अधोगती कडे?’

'नाही तिच्याकडे नाही. गलती कडे. गलती जाते तिथे बेसूर संगीत क्लासात नि आली की दोघी एकत्र अभ्यास करतात. बरं कपडे आले का शिवून? बघू तरी.'

कपडे पाहून चुगली खूश होते.

'त्या बावळट टेलर पेक्षा हा गबाळग्रंथी चांगला शिवतो नाही कपडे? जरा महाग आहे पण.'

दु:शासनराव गोगलगाय कुरियर कंपनीत मॅनेजर आहेत. आजच्या जमान्यात असा सज्जन माणूस मिळणे कठीण. त्यांची पत्नी चुगलीताई पण एक आदर्श गृहिणी. ना कुणाच्या अध्यात न मध्यात. त्यांची निर्बुद्ध आणि दुर्बोध दोघे जुळे मुले. दोघेही हुशार आणि सुशील. मुंगी तर शाळेतली रनिंग चॅंपियन. कासव सर तिला स्पेशल कोचिंग देतात रनिंग चे.

बकाल पुरातील बकाल गृह संकुल एक आदर्श सोसायटी आहे. स्वच्छ आणि सुंदर. महत्त्वाचे म्हणजे तिथले चेयरमन श्री. भ्रष्टकुमार अगदी प्रामाणिक आणि त्यांचे सेक्रेटरी कासवकुमार कामात तरबेज आणि धडाडीचे. त्यामुळे सोसायटीची कामे पटापट होतात.

माझ्या भाषिक मेहनतीचा राजूवर ढिम्म परिणाम झाला नाही. तो कागद त्याने शांतपणे बाजूला सारला.

"तू काहीही म्हण, मामा की काका मी तोच राहतो ना. आणि आता या विषयावरील चर्चा आता थांबवण्यात येत आहे."

अशी वर्तमानपत्रीय भाषा करून मलाही बाजूला सारले. मी तो नाद शेवटी सोडून दिला.

आज काही विपरित घडले. राजूकाका चक्क लोळत पडलेला. बाजूला आजचे पेपर, म्हणजे त्याच्या भाषेत उद्याची रद्दी पडलेली. आजचे पेपर हे आजचे वर्तमानपत्र आणि अनंत काळची रद्दी आहे हे त्याचे आवडते वाक्य. अर्थात कित्येक पेपर आणि त्याच्या फोटोवाल्या रंगीत गुळगुळीत पुरवण्या त्याच दिवशीही रद्दी वाटाव्या अश्या असतात हा भाग वेगळा.

"काय झाले राजू काका, आज अजून असा लोळत का पडला आहेस?"

"खामोश, डोण्ट कॉल मी काका."

"का? का? नावात काय आहे ची थियरी विसरलास का रे श्रीयुत शेक्सपियर?"

थंड पणे तो एक पेपर पुढे करून म्हणाला, "हे वाच."

कोण्या पुतणीने कोणाबद्दल काहीतरी कुठेतरी फेसबुकवर लिहीले म्हणून लोकांच्या भावना फट म्हणता ब्रह्महत्या व्हावी तशा दुखावल्या गेल्या होत्या. त्यावर उतारा म्हणून तिच्या डॉक्टर काकाच्या हाडांच्या हॉस्पिटलात तोडफोड करण्याचा सनदशीर मार्ग लोकांनी निवडला होता. तिकडे हातपाय तुटलेले रूग्ण

होते त्यांचा न दुखावलेला अवयव शोधून ते तोडण्याने लोकांच्या भावना शांत झाल्या होत्या.

"अरे या पुतण्यांनी उच्छाद मांडलाय नुसता."

मी उंदरांच्या उच्छादाबद्दल ऐकले आहे. प्रत्यक्ष उंदीर आणि सन्स.. कदाचित डॉटर्स ही असतील.. यांनी घरात घातलेला उच्छाद अनुभवला आहे. त्यांची पिलावळ कोपऱ्याकोपऱ्यात लपाछपी खेळताना पाहिली आहे. उंदरांची शिकार करण्याचे ट्रेनिंग मी घेतले आहे. पण समस्त पुतणे वर्ग या वर्गात कधीपासून मोडायला लागला कोण जाणे.

"तू पेपर वाचतोस ना?"

"म्हणजे? फक्त रद्दीत विकायला घेतो का?"

मी सात्विक संतापाने बोललो असलो तरी पेपरात मी फक्त फोटोच पाहतो हे मलाच ठाऊक होते.

"मग असे पुतण्याग्रस्त काका किती असतील माहितच असेल तुला."

"अरे मी पेपर फक्त पाहतो. काही काही फोटो जरा जास्तच नीट पाहतो पण बातम्या बितम्या वाचायच्या फंदात पडत नाही."

"नारायण म्हणजे त्रास देणारा आद्य पुतण्या आणि राघोबादादा म्हणजे आद्य पुतण्याग्रस्त काका. टायपिंग मध्ये मिस्टेक झाली, धरावे चे मारावे झाले आणि राघोबा काकांना देहांताची शिक्षा झाली."

"मग राष्ट्रपतींकडे दयेचा अर्ज करायचा. आपल्याकडे दयेचा अर्ज करून वर्षानुवर्ष जिवंत राहाता येते."

"तू वेडाबिडा आहेस काय? मी केव्हाची बातमी सांगतोय असे वाटते तुला?"

"मला माहित नाही. खूप दिवसात पेपर वाचला नाही मी."

राजूकाकाने डोक्यावर हात मारून घेतला.

"मी पेशवाईतल्या राघोबादादांबद्दल बोलतोय."

"असे? तुला माहित आहे ना माझा इतिहास कधीच इतिहास जमा झालाय. माझा इतिहास शिवाजी वर सुरू आणि औरंगजेबाने संभाजीस हालहाल करून ठार केले यावर संपतो. बाहेरच्या देशांचे म्हणशील तर कुणातरी राणीने पाव मिळत नसेल तर केक खा म्हटले हे मला माहित आहे. आपल्या लहानपणी केकच काय पावही मिळत नसायचा म्हणून माझ्या लक्षात राहिले. नवा इतिहास म्हणशील तर १५ ऑगस्टला स्वातंत्र्य मिळाले हे मला ठाऊक आहे कारण आपल्याला नक्कीच सुट्टी मिळते तेव्हा. आता या सर्वात राघोबादादा की काका कुठून आले? माझे इतिहासाचे ज्ञानच इतिहास जमा झालेय."

"ते खरेय."

आपण स्वत:स कमी लेखून बोलतो तेव्हा आपली अपेक्षा असते समोरच्याने हे असे नाही असे म्हणावे, किमानपक्षी गप्प तरी राहावे. पण

समोरच्याने त्यालाच 'हे खरेय' म्हणून दुजोरा दिला तर आपल्याला अधिकच टोचायला लागते. इतिहासात मी मोजून पस्तीस मार्कांनी पास झालेलो, नंतर कधी इतिहासात डोकावलो नव्हतो.

"आज राजकारणात काय सुरू आहे?"

"राजू, don't ask me tough questions. कुठल्यातरी केबीसी त विचारले जातील असे रामाची सीता कोण असे प्रश्न विचार म्हणजे मी उत्तर देऊ शकेन पण हे राजकारण वगैरे..."

"तुला विचारत नाहीये, सांगतोय. जिकडे पहा तिकडे पुतणे आणि काकांची जुगलबंदी. कुठे बेटेसे पुतण्या सवाई, तर कुठे काका वरचढ पुतण्या, कुठे पुतण्या काकाच्या दोन घरे पुढे. पण कधी पुतण्या आणि काका सुखाने नांदतात असे दिसतेय का?"

"नसेल, मग?"

"म्हणून I don't want to be काका. Call me anything else but काका."

"ओके राजूकाका," माझा चुकून नोबॉल पडला, "सॉरी, नुसताच राजू."

"हे पहा मी आता पुतण्या विरोधी चळवळ सुरू करणार आहे."

"म्हणजे?"

"आज मी सर्वांना हाक देतोय, जगातले सर्व काका एक व्हा. काकांना वाचवा. अशी घोषणा देणार आहे मी."

"चांगली आहे आयडिया.."

"हो, पण एक प्रॉब्लेम आहे, समज तू पुतण्या आहेस. तुझे काका माझ्या चळवळीत. आज तू आहेस लहान समज पण तुझा एक मोठा भाऊ आहे जो तुला कधीही काका बनवू शकतो.."

"मग?"

"म्हणजे एकाच चळवळीत तू पुतण्या पण आणि काका पण. म्हणजे तुझे काका तुझ्या विरूद्ध आणि तू तुझ्या पुतण्या विरूद्ध, तेही एकाच चळवळीत. आहे की नाही गंमत?"

"गंमत काय? मला काही नाही कळले तुझे.." "काका, सॉरी बाबा, कळेल. आज नाही तर उद्या नक्कीच कळेल."

"आज मी काका चळवळीचा विचार करतोय. काका तितुका मेळवावा, पुतण्या धर्म घालवावा अशी माझी इच्छा आहे. आजपर्यंत सासूसुनेच्या सिरियल्स आल्या, आता काका पुतण्याच्या येतील. या अखिल विश्व काका संघटनेचा संस्थापक म्हणून मी आपल्या वाडीतल्या लोकांचे आभार मानीन कारण त्यांच्यामुळेच मी स्वत:ला चुलत,मामे, आते, सख्खा असा कुठल्याही प्रकारचा भाऊ नसताना काका झालोय. त्या काका म्हणण्यावरून मला ही प्रेरणा मिळाली आहे."

पेपरात मुलाखत द्यावी तसा राजू बोलत होता.

राजू काकापणाच्या भूमिकेत शिरला नि स्वत:ला कोणी मोठा काकाच समजू लागला. त्याला भानावर आणणे गरजेचे होते. माझ्या हातातील पेपर टेबलावर हातोड्यासारखा आपटत मी मी म्हणालो, "ऑर्डर ऑर्डर. राजू काका माझ्या प्रश्नांची ईश्वरसाक्ष खरी उत्तरे द्या."

राजूची तंद्री भंग पावली असावी.

"तुम्हाला कोणत्याही प्रकारचा भाऊ आहे का?"

"नाही."

"तुम्हाला खराखुरा पुतण्या आहे का?"

"नाही."

"असलाच तरी तोडफोड करायला तुमच्याकडे काही स्थावर मालमत्ता आहे का?"

"नाही."

"तुम्ही कधी लोकसभा. विधानसभा, महापालिका, सोसायटी, साहित्यसंमेलन, नाट्यसंमेलन वगैरेतील निवडणूक लढवली आहे का?"

"नाही."

"तुमचा स्वत:चा मतदारसंघ वगैरे आहे का?"

"नाही."

"पुतण्याग्रस्त म्हणायला तुमच्याकडे या काका नावाला सोडून आणखी काही आहे का?"

"नाही."

"मग तुझ्या भावनांचा आदर ठेऊन मी तुला नुसताच राजू म्हणतो. पण हा उद्योग सोड. सोन्यासारखी ही रविवार सकाळ कुरतडू नकोस. त्यापेक्षा उडप्याकडे मसाला डोसा कुरतडू चल."

"होय, खरंय तुझे, चल."

तो टुणकन उठला आणि आम्ही बाहेर पडलो.

(ऑल द बेस्ट दिवाळी २०१६)

# ऋतुचक्रम्



आमचे एक आहे. रविवार म्हटले की बाजार चुकत नाही. एकतर परमेश्वराचा मत्स्यावतार वाट पाहात असतो आमची. आणि आठवड्यातल्या कित्येक गोष्टींबद्दल चिंतन करण्याचा अॅजेंडाही असतो आमचा, तो चालता चालता पुरा करतो आम्ही. त्यादिवशी शण्मुगम खूप दिवसांनी भेटला. शण्मुगम आमचा जुना इडली फ्रेंड. म्हणजे आमच्या डब्यातल्या वांग्याच्या भाजी बदल्यात त्याच्या डब्यातली इडली आमच्या डब्यात पाडून घ्यायचो शाळेत तेव्हापासूनचा.

"किदरको?"

"अरे, रविवार सकाळ मीन्स बाजार को.. खूप दिनके बाद भेटताय.. आय मीन मीटताय .. मीटिंग .."

"हां रे, लाॅट ऑफ डेज.. कमिंग? रामा शेट्टीके पास.. इडली दोशा .. सिंबली वंड्रफुल .."

"नाही रे.. बायको वेटिंग .. घरपर.. फीश नै लाया टाइमपर तो शी विल्बी फिश विदाऊट वॉटर.."

इतक्यात पावसाची सर आली एकाएकी .. आम्ही शेट्टीच्या आसऱ्याला आलो..

"व्हाॅट अनसिझनल रेन.. आजकल कोई किसीका ठिकाना नै रहा.."

"हो ना. कभी भी पाऊस पडता है.."

"मैं बोल्ता ना.. ग्लोबल वॉर्मिंग है.. सबकुच बिगडाय.. वो क्या बोलते.. बिगडाय ऋतुचक्रम.."

ऋतुचक्रम?

ग्लोबल वॉर्मिंगमुळे हवामानाची वाट वगैरे लागते म्हणे. त्याला 'ऋतुचक्रम' म्हणणे म्हणजे ..

गरम डोश्याचा तुकडा गरम सांबारात बुडवत नकळत शण्मुगम ग्लोबल वॉर्मिंगचे वर्णन करून गेला!

आम्ही निघालो ते चिंतनाचा नवीन विषय डोक्यात घेऊन..

त्या चिंतनात काय काय नव्हते?

***

व्हा◌ॅटस्ॲपच्या जमान्यात पाऊस म्हणजे कांदाभजी खात आणि वाफाळलेला चहा पीत खिडकीबाहेर बघत बसण्याचा सीझन. इकडे पहिल्या पावसाच्या सरी पडल्या की तिकडे मोबाईल मध्ये भज्यांचा नि चहाच्या वाफ सोडणाऱ्या कपांचा पाऊस पडायला लागतो. नशीबाने मोबाईलमध्ये सेव्ह केलेल्या भज्या वर्षानुवर्षे ताज्या राहतात नि त्या बरोबरचा चहा देखील वाफाळताच असतो. आणि एका क्लिकद्वारे एकीकडून दुसरीकडे क्षणार्धात पोहोचतो ही तो. त्यामुळे पहिल्या पावसाबरोबर सारे नेटकरी.. आभासी का होईना .. भज्या खात नि चहा पीत बसतात.. मोबाईल हाती घेऊन.

पण खरा पाऊस सुरू होतो तो कावळ्याच्या छत्र्या उगवल्या की. आपल्या छत्र्यापण बाहेर यायला लागतात. खरेतर कावळे या छत्र्या उघडायला वेळ घेतात पण ही भूछत्रे म्हणजे जमिनीचा न भिजण्यासाठीचा खटाटोप असेल का? की उन्हामुळे जगाला तापवून टाकणारी धरणी छत्र्यांमागे तोंड लपवत असेल? असे काही म्हटले की अगदी खोलवर काही मौलिक चिंतन करून

लिहिल्यासारखे वाटते! कदाचित कोणास ते काव्यमय असल्याचाही संशय येईल.. पण ते असो.

.. तर बेडकाची झोप मोडतो तो पाऊस. आपल्या बिळात शांतपणे उन्हाळा काढणाऱ्या बेडकांना खडबडून जागे करतो तो पाऊस. उगाच सारे बेडूकगण मग गळ्यातल्या बेडक्या फुगवत डराव डराव असा निषेधाचा ठराव करण्याचा केविलवाणा प्रयत्न करत राहतात. पण पाऊस कोणाचेच ऐकतो थोडीच. नेमेचि तो येतच राहतो.

बाहेर आकाशात काळे ढग जमायला लागले की मनाचा मोर थुई थुई नाचायला लागतो म्हणे.. दहावीच्या (मराठी मिडियम) परीक्षेत निबंधात.. दहापैकी आठ मार्क मिळालेल्या! तर मनमोर नाचू लागतो मनातल्या मनात. आणि जिथे कुठे असेल तिथे खराखुरा मोर. आजकाल मोर इतर कुठे नसतील तर हमखास सापडण्याची जागा म्हणजे मंत्री संत्री वगैरेंची शासकीय पण म्हणूनच तहहयात त्या मंत्र्यांच्या मालकीची सदने आणि राजकारण्यांची पुनर्वसन सदने म्हणजे राजभवन वगैरे. अर्थात तिथे आपल्यासारख्या सामान्यातिसामान्यास अख्खा मोर काय तर त्याच्या डोक्यावरचा तुराही नजरेस पडणार नाही पण वेगवेगळ्या चित्रांतून नि सिनेमातून पाहिलेल्या पिसारा फुलवून नाचणाऱ्या मोराची कल्पना करायला काय हरकत आहे? तर बाहेर काळे ढग जमले की मोर पिसारा फुलवत नाचू लागतो.. धरतीवरची तृणपाती जलबिंदूंची आणि सृष्टी पर्जन्यधारांची .. तृषार्त प्राणिमात्र आपल्या जीवनाची

म्हणजे पाण्याची आतुरतेने वाट पाहू लागतात. पर्जन्यराजा म्हणजे वरूणाचा प्रसाद. सारी सृष्टी दो करांनी प्रसादाचा स्वीकार करायला तयार असते.. श्यामल मेघ आकाशात दाटून येतात. एकाक्षणी अचानक बरसू लागतात. त्या आनंदधारांत सारे सचैल न्हाऊन निघतात.. ( त्याच दहापैकी आठ मार्क्स वाल्या निबंधातून.. साभार )

.. इतके सारे त्या काळया ढगांचे कर्तृत्व असेल हे आम्हाला सांगून ही पटत नाही. सात जून उजाडली तारीख की लहानपणी सुटी संपून शाळा सुरू होणार याची आठवण यायची. मृग नक्षत्राच्या मुहूर्तावर शाळा सुरू व्हायची घंटा डोक्यात वाजायची. तर आता आठवण फक्त शाळा सुरू होणार म्हणजे नव्या पुस्तकांची नि पाटी दप्तराच्या खर्चाची नि भराव्या लागणाऱ्या फियांची येते. पावसाच्या चार महिन्यात हमखास बंद पडणाऱ्या रेल्वेची .. नि रस्तोरस्ती पाणी साचून खोळंबलेल्या गाड्यांची येते. त्यात हिरवागार शालू नेसलेली नि नवचैतन्याने बहरलेली सृष्टी बघायची दृष्टी येणार कुठून? तरी ती सृष्टी तशी असते .. निबंधात लिहिलेले खोटे कसे असेल?

ज्येष्ठात सुरू झाला की पाऊस आषाढ गाजवायच्या तयारीला लागतो. अगदी वैशाख संपत आला की ट्रायल म्हणून वळवाच्या सरी पाडून जातो. पण त्याची धुंवाधार फलंदाजी पहावी ती आषाढात. आषाढस्य प्रथम दिवसे कालिदासाला भेटलेला ढग बरसू लागला की थांबायचे नाव नाही. मग श्रावण महिना म्हणजे सगळ्यांचा आवडता. बालकवींनी हर्ष मानसी कधीच जाहीर करून टाकलेला. सणांच्या नि व्रतवैकल्यांच्या रेलचेलीमुळे श्रावण महिना सर्व

ललनांसाठी बिझी महिना. श्रावण आला की आमच्या माहितीतल्या देवभक्त नि देवभोळया पगारेबाईंच्या चेहऱ्यावर वेगळेच तेज चढते. महिनाभर बाई उपवासाला बसतात. दर दिवसाचे महात्म्य रोज समजावून सांगतात. इतक्या वर्षांत त्यातील एकही गोष्ट ध्यानात न आली, न राहिली. नागपंचमी आणि जन्माष्टमी सारखे प्राॅमिनंट सण सोडून. नाही म्हणायला श्रावण महिन्यात एकेका दिवसाच्या कहाण्या ऐकायची मजा होती लहानपणी. पण लहानपणी पाऊस पण 'श्रावणातला क्षणात येते सर सर शिरवे' असा कवीने घालून दिलेल्या शिस्तीबाहेर नसायचा. आता ऋतुचक्रम झाल्याने अगदी श्रावणातही घन काळा बरसतो, तो ही मुसळधार. भाद्रपदातला पाऊस गणपतीच्या मंडपात आधी शिरायचा नाही. उगाच कुठे मंडपाबाहेर चिखल करण्याइतपत यायचा. पण हल्ली तेही ताळतंत्र सुटलेय.. निसर्ग माणसाचा गुरू असल्याचे वाचलेय आम्ही. लोक उगाच माणसाने ताळतंत्र सोडल्याबद्दल काहीबाही बोलत असतात. पण आपल्या गुरूनेच ते सोडले तर शिष्य दुसरे काय करणार? पावसाने कसे आपल्या ॲलोटेड महिन्यांत यावे. चार महिने रहावे नि निघून जावे. पण नाही. हल्ली तर तो दिवाळी करून ही जातो कधी कधी. पडताना किती पडावे याचा हिशेब ठेवावा. काही ठिकाणी 'घेता किती घेशील दो करांनी' अशी अवस्था तर कुठे 'पोटापुरता पसा पाहिजे' म्हणणाऱ्याला दोन घोट पाणी न मिळू देण्याची अवस्था.

गंमत म्हणजे या पावसाला 'सृष्टीचे कौतुक' जाणणारी बाळे आहेत आपल्याकडे. बाळे म्हणजे कविलोक. या कवींना काय कसे दिसेल सांगता येत नाही. म्हणजे जे रवि ला न दिसेल ते कवि बघतो म्हणे. म्हणूनच उन्हाळा नि हिवाळ्याचे कौतुक नाही. 'नेमेचि येतो फक्त पावसाळा' .. आणि हे 'सृष्टीचे कौतुक जाण बाळा?' ज्या सृष्टीने पावसाळा बनवला तिनेच उन्हाळा नि हिवाळा बनवला की नाही? पण उन्हाळा नि हिवाळ्यावर कविता काय.. तर 'आला उन्हाळा किंवा हिवाळा नि तब्येत सांभाळा..' इतकीच! पावसाबद्दल सारेच असे पार्शालिटी करताना दिसतात. पावसाने येणारा पूर नि वाहून जाणारी गावे दिसत नाहीत.. अतिवृष्टीने नुकसान दिसत नाही .. उन्हाच्या तापाने हिट स्ट्रोक दिसतात. थंडीत गारठलेली गावे दिसतात. पण लाडक्या पाऊस बाळाच्या खोड्या नाही दिसत. तरी या पावसाचे कोण कौतुक. 'घनघन माला नभी दाटल्या' पासून ते 'रिमझिम रिमझिम रेशीम धारा' पर्यंत .. मुसळधार पासून ते थेंबथेंब पावसापर्यंत.. पावसावर कविता केल्यावाचून चैन नाही या कवी जमातीला. शाळेत पहिली कविता पण 'ये रे येरे पावसा!' कुणी 'येग येग थंडी अंगात घालीन बंडी' अशी सोपी कविता सहज करू शकला असता. पण नाही. अगदी पूर आला यमुनेला नि पाणीच पाणी चहूकडे झाले तरी या कवीलोकांना जनजीवन विस्कळित झाल्याचे दिसत नाही.. तर जान माल का नुकसान दिसणे तर दूरची गोष्ट. त्यांना फक्त 'गेला मोहन कुणीकडे' एवढीच चिंता सतावते. उन्हाळ्याला रखरखीत म्हणत हिणवणारे कवी हिवाळ्याला फारतर फार गुलाबी थंडी पर्यंत तरी कवितेत आणतात. आणि लेखकांचे काय.. 'त्या रात्री

पाऊस होता' म्हटले की गोष्टीला आपोआप रहस्यकथेचा वास यायला लागतोच .. अगदीच 'कथानकाची गरज' म्हणून सिनेमावाले कृत्रिम पावसात नायक नायिकेला भिजवताना दिसतात.. पण रणरणत्या उन्हात मात्र असली गाणी गात फिरत नाहीत घामाच्या धारा काढत ते. 'अंगे भिजली जलधारांनी' म्हणत बिचारे नंतर सर्दीच्या गोळया खात बेजार होत असणार. रणरणीत ऊन आणि बिन पावसाने भेगाळलेली जमीन आली सिनेमात तर लगेच कलात्मक फिल्मचा माहोल आपोआप तयार होतो. त्यात मग दाढीचे शेवाळ वाढलेला गांजलेला शेतकरी दिसला की सामाजिक बांधिलकीही साधली जाते. अगदीच कमिटेड असेल सिनेमावाला तर एखादा शेतकरी आत्महत्याही करेल सिनेमात. थोडक्यात पावसाचे असणेही नि नसणेही दखलपात्र असते. तितके बाकी ऋतुंकडे लक्ष देत नाही कोणी.

'ती गेली तेव्हा रिमझिम पाऊस निनादत होता..' ऐवजी

'ती गेली तेव्हा डोईवर दिनकर तळपत होता

भूमी तापली होती.. घामाच्या धाराही लागत होत्या..'

अशी कविता नाही का करता येत? बॅकग्राउंडला तोच पाऊस हवा. थंडीचे काय. मी म्हणणारी नाहीतर गुलाबी. नाही म्हणायला लहानपणी 'गुलाबी थंडी अंगात बंडी' इतपत काव्यमय ओळख झालेली थंडीशी. पण आता थंडी फक्त हवामान खात्याच्या बातम्यांत कमाल आणि किमान तापमानात दिसते. हवामान खाते हे प्रकरण त्या अनुषंगाने कित्येक विनोदांना आश्रय देणारे खाते आहे. एकीकडे लहरी हवा आणि हवामान आणि त्याचा अंदाज चुकला म्हणून

लक्ष्य बनणारे बिचारे हवामान खाते. सुटला वारा नको तिथे नि घेऊन गेला ढगांना दुसरीकडे कुठे क्षणार्धात तर त्या बिचाऱ्यांची काय चूक. पाऊस काय आधी हवामान खात्याचा अंदाज वाचून मग पडतो? पण बहुतेक हवामान खात्याला बदनाम करणाराही हाच पाऊस असतो. 'उद्या थंडी खूप पडेल नि तापमान १२ डिग्री सेल्सियस पर्यंत खाली येईल' असा अंदाज चुकला काय की बरोबर आला काय.. कोण लक्ष देतोय. पण उद्या आकाश निरभ्र राहिल म्हणून छत्री न घेता जावे बाहेर नि मुसळधार पावसाने स्वागत करावे.. असे झाले तर त्या खात्याचा उद्धार झाल्यावाचून कसा राहिल? यात चूक त्या पावसाची. चांगला हवामान खात्याशी संपर्क करून अंदाज वाचून घ्यावा नि त्याप्रमाणे बरसावे. पण नाही. आपली मनमर्जी चालवत राहतो तो बिघडलेल्या बाळासारखी.

शण्मुगमच्या त्या ऋतु चक्रम मुळे आम्ही चक्रावलो. तशी सवयच आमची. लहानपणी बीजगणितातली बीजे समजली नाहीत की चक्रावून जायचो आम्ही. तसे आम्ही चक्रावलो की विचारात पडतो. आणि मग त्या गोष्टीचा धांडोळा घ्यायच्या मागे लागतो. आमच्या हाती मग काही मौलिक चिंतन पडले.. एक प्रश्न आहे इथे .. चिंतन मौलिक असले की मगच त्यातून अमौलिक काही हाती लागते? की अ-मौलिक असाही काही चिंतनाचा प्रकार आहे? असो. आमचे चिंतनाबद्दलचे हे अ-मौलिक चिंतन आणि मंथन नि त्यातून मिळालेले अमौलिक नवनीत इथेच सोडू, नाहीतर विषयांतर व्हायचे..

तर त्या चिंतनीय अशा चिंतनात मिळालेली विचार मौक्तिके उद्धृत करण्याचा मोह टाळवत नाही .. त्या चिंतनात काय नाही? लहानपणी पावसाच्या सरी पडल्या की त्या वाहत्या पाण्यात सोडलेल्या कागदाच्या बोटींची आठवण आहे.. तारुण्यातील एक छतरी और हम दोनों असले रोमँटिक अनुभव आहेत.. नि मध्यम वयातील पावसाच्या पहिल्या सरीबरोबर चोंदलेले नाक पण आहे. हे सारे त्या चिंतनाचा लालित्यपूर्ण लेखनाचा कोशंट वाढवण्यासाठी. त्यात पावसाच्या एकूण पडण्याची नोंद आहे, ओलिताखाली गेलेल्या नि सिंचनाअभावी रोडावलेल्या जमीनीचे क्षेत्र किती याची नोंद आहे.. आणि घसरत्या पर्यन्यमानाची मापे ही काढली आहेत. पावसाचे काय वेळेत पडला तर ठीक नाहीतर अवकाळी पाऊस शेतांवर अवकळा पसरवतो. हे वाचून आम्हाला जुने दिवस आठवले

पूर्वीच्या काळी लोक म्हणायचे विशेषतः मुलगी वयात आली की, सारे काही वेळच्यावेळी झालेले बरे.. म्हणजे तसेच या पावसाचे आहे तर. त्या चिंतनात पावसाच्या लहरीपणाचे माप माणसाच्या पदरात घातले आहे. म्हणजे या चक्रमपणाला कारण माणसाचा चक्रमपणाच!

असो. आम्ही आमचे चिंतन आवरते घेऊन काही निष्कर्षास पोहोचलो. शण्मुगम म्हणतो ते खरेच. 'ऋतुचक्रम' बिघडलेय. माणसाच्या शरीरात शारिरीक तोल सांभाळणारी यंत्रणा असते म्हणे. मानसिक तोल सांभाळणारी पण असावी. पण एखाद्याला आजूबाजूच्यांनी डिवचून चिडवून बेजार करून टाकावे, त्याचा

तोल बिघडवून टाकावा नि त्याने चक्रमासारखे वागावे.. असेच काही या ऋतु चक्रमपणाचे कारण असावे. त्यात सारेच ऋतू महत्त्वाचे. शरद,वसंत,ग्रीष्म,वर्षा वगैरे सहा ऋतुंबद्दल कुणी बोलत नाही हल्ली. पण आहेत ते तीन ऋतू महत्त्वाचेच. एकाचा तोल सांभाळायला दुसरा हवाच. दोडक्या उन्हाळ्यावाचून लाडका पाऊस दिसायचा नाही म्हणे! म्हणजे ऋतु म्हणून पावसाला झुकते माप देणाऱ्यांचा हा चक्रमपणाच म्हणावा!

आमच्या प्रकृतीला इतके मनन चिंतन मानवत नाही.

पण ते आम्ही केलेच. मागच्या रविवारीच भेटलेला शण्मुगम. आज मत्स्यावतारास पिशवीत घालून येताना तोच पाऊस परत तसाच कोसळायला लागला. उन्हासाठी बरोबर नेलेली छत्री पावसासाठी उपयोगी पडली. भिजून घरी आलो.. बायको म्हणाली, "पावसाचा नेम नाही आजकाल. सारे ताळतंत्र बिघडलेय.. लवकर कपडे बदला. कांदेभज्या करतेय.. गरमागरम चहाबरोबर खायला या पटकन्.."

# आदमी.. आम, उद्दाम आणि दाम!

आम आदमी तसा आम असतो. तो अत्र तत्र सर्वत्र आढळतो. आम नावाचा असला तरी तो हापूस, केशर, पायरी, राजापुरी किंवा गेलाबाजार तोतापुरी वगैरे नसतो. साधा रायवळ आम. त्याला आम म्हणून तशी किंमत असते पण रायवळ आम म्हणून तितकीच किंमत. तसा हा सोशिक असतो. आपल्या मोठमोठया लोकांनी सांगितलेले निमूटपणे ऐकतो. नुसता ऐकतोच असे नव्हे तर त्याच्यावर विश्वास टाकून विश्वास ठेवतो. कोणाला तो नेता मानतो तर कोणाला पुढारी. त्यांच्या सांगण्याबाहेर तो नाही. त्या सगळ्यांच्या पुढे तो अदबीने माना तुकवतो. त्यांना लवून सलाम ठोकतो.

हाच आम आदमी पंचवार्षिक आम आदमी उत्सव आला की मखरात बसतो. गणपती बसवावा तसा. सगळ्या राजकीय पार्ट्या आम आदमीला मखरात बसवून सजावट करतात. त्याची साग्रंसगीत पूजा होते, नैवेद्य वगैरे चढवला जातो. त्याच्या आरत्या गायल्या जातात. सारा आसमंत दुमदुमतो. काही दिवस त्याच्या शिवाय दुसरा विषय नाही. आणि तोच नव्हे तर गाड्यानिमित्त नळाची यात्रा निघावी तसे त्याच्या उंदराचेही लाड होता. आम आदमी भारावून जातो. मग उत्सव संपला की साग्रंसगीत आम आदमीचे विसर्जन होते. येथे मात्र ढोल ताशे वाजत नाहीत. कारण सारे वाजंंत्रीवाले विजेत्यांच्या मिरवणुकांत बिझी होतात. आम आदमी विसर्जन झाले की स्वस्थ

बसतो. पाच वर्षांनी 'अपना टायम आएगा' या विश्वासाने. आणि त्याच्या विश्वासाला कधीच तडा जात नाही. कित्येक वर्षे त्याची प्रतिष्ठापना होत आली आहे. त्याला मखरात बसवले की त्यात प्राण ओतला जातो. आम आदमी जिवंत होतो. कुणी म्हणतो, जिवात जीव येतो त्याच्या. मग त्या झगमगत्या मंडपासारख्या घरावर औट घटकेचे राज्य करून 'आम्ही जातो आमच्या गावा' म्हणत तो परत आपल्या झोपडीत येऊन त्या दिवसांची आठवण काढत बसतो.

कुणी म्हणेल बाकी वर्षे काय होते त्याचे? त्याला विसरतात सारे? तर नाही. त्याचे नाव सर्व नेतेगण नित्यनेमाने घेतात. ईश नामाने दुनिया तरून जाता जाते. आम आदमीच्या नाव घेता घेता तशीच राजकीय नौका वल्हवता येते. त्याच आम आदमीच्या आमदनीची चिंता वाहवली जाते. मधून मधून सिझन नसतानाही आम आदमी मोहरून जातो. पण आपली पायरी ओळखून परत आपल्या जागी बसतो. सोशिकपणा हा त्याचा व्यवच्छेदक गुण. त्या जोरावर आम आदमी आपले आयुष्य कंठतो.

मग कधी कधी त्याला आपल्या ताकदीची जाणीव होते. उगाच तो गुरकावायला लागतो. कुणाच्या अंगावर धावून जातो. हक्कांबद्दल काही बाही बरळू लागतो. अशावेळी मग त्या आम आदमीचा सामना उरलेल्या उद्दाम आदमीशी व्हायला लागतो.

उद्दाम आदमी तसा संख्येने कमी. पण ताकदीने जादा. आम आणि उद्दाम आदमींच्या ताकदीची तशी तुलनाच होऊ शकत नाही. उद्दाम आदमी आपल्या

ताकदीच्या बळावर सारे पार पाडत असला तरीही त्याला मधून मधून आम आदमीचे नामस्मरण करावे लागते याची त्याला खंत असते. आम आदमीचे नाव पंचवार्षिक उत्सवात सगळ्यात महत्त्वाचे. त्यास टाळून पुढे जाता तर येत नाही नि त्या फाटक्या तुटक्या कपड्यांतल्या नि त्याहूनही फाटक्या नशिबाच्या आम आदमीपुढे उद्दाम आदमीला झुकावे लागते. तसा उद्दाम आदमी हुशार. उद्दाम आदमी बनण्याअगोदर तो अभिनयाचे प्रशिक्षण घेत असतो. त्यामुळे बेमालूम अभिनयातून तो आम आदमीला हातोहात बनवू शकतो. तरीही आपल्या पोझिशनमध्ये हे असे करावे लागावे याची खंत त्याला वाटत असतेच. आम आदमीच्या भल्याची चिंता दाखवत दाखवत उद्दाम आदमी स्वतःपासून त्या भले करण्याची सुरूवात करतो.. कारण तो अंतर्यामी जाणून असतो, काहीच वर्षांपूर्वी त्याला ही अशीच आम आदमींतून उद्दाम आदमीची बढती मिळालेली आहे. तेव्हा लोकां सांगे ब्रह्मज्ञान असे काही न करता तो स्वतः पासून सुरूवात करतो. आपले भले झाल्याशिवाय इतरांचे भले करणार कसे? तेव्हा तो कामाला लागतो.

पण उद्दाम आदमीचे एक आहे, त्याची गुणवैशिष्ट्ये नावाला साजेशी असली तरी भाषा नि बोली आणि अभिनय प्रशिक्षणातून कमावलेली देह बोलीही उद्दाम शब्दाच्या विपरीत असते. नम्रतेचा नि विनम्रतेचा चालता बोलता पुतळा बनून उद्दाम आदमी आम आदमीच्या दिलोदिमाग वर राज्य करण्यास तयार असतो. त्याच्या बोलण्यात उद्दामपणाचा लवलेशही न दिसावा इतकी अभिनय क्षमता तो बाळगून असतो. तसा उद्दाम आदमीसाठी रात्रं दिन युद्धाचा

प्रसंग असतो. त्याच्या आजूबाजूस सारे त्याच्याच बिरादरीतील उद्दाम आदमी. कोणाकोणावर किती नजर ठेवणार? एकाहून एक अभिनय सम्राट नि कित्येक तर आम आदमीची नस अन नस ठाऊक असलेले. त्यांवर कडी करून खुर्चीत टिकून राहणे म्हणजे रात्रीचा दिवस करणे आले. तरीही हा उद्दाम आदमी थकत नाही. अथक ध्येयाकडे वाटचाल करत राहतो. आम आदमी वयाच्या पन्नाशीत थकतो नि उद्दाम आदमी त्या वयात आताशी कुठे उद्दाम आदमी म्हणून वयात येतो.

आम आणि उद्दाम यांवर वरताण पण अगदी अल्पसंख्यांक असा अजून एक वर्ग असतो. तो म्हणजे दाम आदमी. तो दामाच्या जोरावर उद्दाम आदमीला नाचवणारा. आम आदमीशी याचा सुतराम संबंध कधी येत नाही. आणि उद्दाम आदमी सारखे आम आदमीचे भले चिंतण्याची दाम आदमीला तशी गरजही पडत नाही. या दाम आदमीला 'दाम करी काम' असे म्हणण्यास ही फुरसत नसते. त्याचा एकेक क्षण लाखमोलाचा. त्यामुळे तो क्षणश: धनार्जनात व्यस्त असतो. त्यासाठी तो उद्दाम आदमीला हाताशी धरून दुनिया मुठीत यावी म्हणून आपली मूठ मोठी करण्यात दंग असतो. उद्दाम आदमी ही तसा देवीभक्त. लक्ष्मीदर्शनासाठी तो दाम आदमीच्या शब्दाबाहेर नसतो. हे दाम उद्दाम यांचे मिळून राहणे मात्र आम आदमीच्या नजरेपासून मुद्दाम दूर असते. उगाच कुणाची वाईट नजर न पडो म्हणून.

जीवशास्त्रीय शृंखलेच्या संकल्पनेत पिरॅमिड सारखी रचना सांगितली जाते. त्याच्या तळाशी उत्पादक वर्ग.. संख्येने सर्वात जास्त. आम आदमीचा. त्यावर त्या उत्पादकांवर अवलंबून असणारा तुलनेने कमी संख्येतील दुसरा वर्ग.. उद्दाम आदमीचा नि त्यावर अवलंबून असणार अल्प संख्येने असणारा तिसरा वर्ग.. दाम आदमीचा! जीवनसाखळीचा हा भाग वास्तवात दिसतो तो या तिन्ही वर्गांमुळे. जीवशास्त्रीय संकल्पनेत ही साखळी तुटून चालत नाही तर समाजशास्त्रीय संकल्पनेत तुटून कशी चालेल?

शेवटी काय आम आदमीवर सारा डोलारा उभा आहे.. आम आदमीला आपले विहित कर्तव्य निभावल्या शिवाय कसे राहता येईल?

पिरॅमिडच्या तळाशी राहून उगाचच वैतागून, नि हाती छदाम नसताना कंटाळून उद्दामपणा दाखवणे हे आम आदमीला न शोभेल, न परवडेल, ना जमेल..

शेवटी काय, प्रत्येकाने आपापली पायरी ओळखून रहावे म्हणजे बरे. विशेषत: पायाशी असणाऱ्या आम आदमीने!

# गोष्ट एका शोकसभेची



नाना नानी पार्कातल्या त्या चौघांची खास मैत्री होती. आज त्यांच्या त्या ग्रुपची चौथी ॲनिव्हर्सरी. त्यानिमित्ताने आज खास कार्यक्रम ठरलेला. चार वाजता त्या पार्कातल्या बेंवचर जमले सगळे. दादा राऊतांनी सुरूवात केली..

"जमले सगळे .. एक दोन तीन चार.."

"इन मीन चार डोकी. मोजताय कशाला?"

"राऊत सर.. शाळेतली सवय.. अशी तशी जातेय थोडीच.."

"अरे पण आता बावीस वर्षे झाली रिटायर होऊन.. जित्याची खोड.."

"खोड आणि मुळं.. पार जमिनीत रूतलीत.. आता आपल्याबरोबरच जायची.."

"अप्पा जोशी .. आता सुरू करा.."

"चाल नी.. शुरू कर दे नी.."

"मला पण तेच वाटतेय.. एकेकानी सुरू करा.. अप्पा तुम्ही भाऊरावांचे सगळयात जवळचे. तुम्ही सुरूवात करा.."

"असं म्हणताय? लिहून आणलंय ते वाचू?"

"कशाला? होऊन जाऊ दे असंच.. मनात येईल ते.."

"ठीक.."

अप्पा जोशी उभे राहून बोलायला लागले ..

"मला वाटतं बसून बोललात तर चालेल.."

"नको. मृतात्म्यास काय वाटेल? मी उभा राहूनच बोलतो.. तर मित्रांनो.. आजचा दिवस आपल्या सर्वांच्या आयुष्यात दु:खाचा दिवस आहे. आपले भाऊराव कदम आपल्याला सोडून गेले. देवाचे बोलवणे सर्वप्रथम त्यांना आले. आपली सर्वांची जी इतक्या वर्षांची साथ होती ती आता सुटली. भाऊराव आता स्वर्गाच्या दारात असतील. त्यांच्या आठवणी मागे सोडून ते गेले. आपण त्यांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी जमलो आहोत. माझ्या नंतर दादा राऊत आणि हे जसवंत शाह भाऊरावांबद्दल बोलतीलच. पण भाऊरावांना मी सर्वात जवळून ओळखणारा. माझी त्यांची मैत्री आम्ही कॉलेजात असल्यापासूनची. भाऊराव तेव्हाही तल्लख बुद्धीने चमकायचे. कॉलेजात भाऊ या नावाने होणारी पंचाईत सोडली तर सारे काही छान होते. कॉलेजच्या

नाटकात ते ॲक्टिंग करत.. खरेतर त्यांची माझी दोस्ती तेव्हापासूनची. तेव्हा त्यांना अहो जाहो मध्ये संबोधणे कठीण जाते.. पण परमात्म्याकडे पोहोचलेल्या भाऊस भाऊराव म्हणणेच योग्य असे वाटते मला. कॉलेजात भाऊराव चांगलेच प्रसिद्ध होते. फायनलला ते कॉलेजात पहिले. मी दोन गुणांनी दुसरा.. ते पुढे नोकरीला लागले. मी पोस्टग्रॅज्युएशनला गेलो.. गंमत म्हणजे पुढे मी घुमून फिरून त्याच ऑफिसात पोहोचलो. दोन मित्र सात आठ वर्षांनी परत एकत्र आले.. आमची डिव्हिजन वेगळी होती पण दररोज भेटगाठ होती. पुढे ऑफिसातून कर्ज घेऊन या सोसायटीत दोघांनी एकत्रच घरे घेतली.. सख्खे मित्र सख्खे शेजारी झालो. वीणा वहिनी म्हणजे भाऊरावांची पत्नी .. भाऊ नावामुळे त्यांचे लग्न ठरत नसावे असा माझा अंदाज होता.. विचार करा.. ऑफिसातली वीणा कामत त्यांना म्हणतेय.. मला तू खूप आवडतोस भाऊ.. ओवाळिते भाऊरावा म्हणण्यापासून सुटका करून देण्यात माझा हात होता.. म्हणजे वीणा माझ्या ओळखीतली. तिला भाऊ आवडला हे लक्षात आले तसा इशारा दिला तिला मी, बाई.. त्याला आडनावाने हाक मार नाहीतर अजून कुठच्या. भाऊ मात्र नको.. गंमतीचा भाग सोडला तर पुढे त्यांचे जमले. वीणा माझी रीतसर वहिनी झाली. सख्खा शेजार झाला.. वहिनी सुगरण .. माझी खाण्याची सोय झाली.. असो. भाऊरावांबद्दल काय सांगावे? कॉलेजात हुशार होते ते ऑफिसातही कामसू. आलेल्या पेपर्सचा फडशा पाडून बसायचे नि इतर जण ओव्हरटाइम घेऊन काम करत असताना ते घरी वहिनीच्या हातचा चहा पीत असायचे. त्यांच्या मनमिळाऊ स्वभावाने त्यांनी ऑफिसात सगळ्यांना जोडून

ठेवले होते. त्यामुळे ऑफिसच्या राजकारणात भाऊरावांना शत्रू असा कोणी नव्हता. सगळेच मित्र त्यांचे. त्यात अडलेल्यास मदत करण्याचा स्वभाव त्यांचा. ऑफिसच्या शिपायाला मदत करून त्याला मॅट्रिक व्हायला लावले ते त्यांनी. त्यासाठी ते संध्याकाळी थांबून त्याला इंग्रजी शिकवत. अशा मदतीचा हात त्यांनी मलाही दिलाय कित्येकदा. म्हणजे मी पोस्टग्रॅज्युएट असेन भले ही पण ऑफिसात ही वॉज सीनियर टू मी. ते जाणवू न देता ही युज्ड टू हेल्प मी. आणि ते इतरांनाही अशीच मदत करत. कोणाकडून कसली अपेक्षा न ठेवणे हेच त्यांच्या आनंदीपणाचे रहस्य असावे. आम्ही एकाच महिन्यात एकाच वेळी रिटायर झालो. घरी रिकामटेकडे बसायला लागलो.. रोज सकाळी मग आम्ही फिरायला जाऊ लागलो. भाऊरावांना लिहायची हौस होती. बोलता बोलता आपल्या लिखाणाची रूपरेषा सांगायचे. तशी दोन पुस्तके त्यांची प्रकाशित झाली. त्यानंतर आत्मचरित्रात्मक 'भाऊचा धक्का' लिहिणार होते ते. पण त्यांच्या अचानक जाण्याने तो धक्का आपल्या सर्वांनाच बसावा हा दैवदुर्विलास म्हणावा. भाऊरावांची तब्येत तशी ठणठणीत होती. शिस्तशीर राहणी, मोजके खाणे नि नियमित व्यायाम यामुळे ती त्यांनी सांभाळली होती. त्यामुळे अंथरूणात पडून राहिलेले भाऊराव कधी मी गेल्या एकोणऐंशी वर्षांत पाहिले नाहीत. मला वाटते असेच ॲक्टिव्ह असताना ते गेले.. त्यांच्या एकूण व्यक्तिमत्वाला मिळालेला हा न्यायच असावा. एरवी ही ते सदा शांत असत.. आता त्यांच्या आत्म्यालाही शांती लाभेलच.. भाऊराव तुम्ही आमच्या

आठवणीत सदैव असाल. पुढील जन्मीही दोस्त म्हणून आपण भेटूच अशी प्रार्थना करतो.."

अप्पा जोशी हात जोडून खाली बसले. दादा राऊत म्हणाले, "जसवंत शाह आता भाऊराव कदम यांना श्रद्धांजली अर्पण करतील."

जसवंत शाह बोलायला उभे राहिले ..

"भाऊरावाची अन माजी ओळखाण लई वरसापासुनची नाय या जोशीबुवासारखी. आम्ही भेटला ते इकडे. रिटायर माणसांच्या असोसिएशन मंदी. तिकडे प्रोग्राम करायला भाऊराव यायचा. एकदोन वेळा भाऊरावानी तेचा बुक वाचलेला दोन चाप्टर. मराटी माजी भाषा नसेल पन समजते समदी. भाऊराव रायटर चांगला होता. तेची एक ती कहाणी होती.. दोन दोस्तांच्या मैतरीची अन भांडणाची. लई आवडलेली. मग कळळं भाऊराव बाजूच्या बिल्डिंगीतच राहातो. हळूहळू भेटला तो अन फ्रेंडशिप झाली. फ्रेंड म्हणून तो एकदम झकास माणस होता. महिन्यात एकदा तो माझ्याकडे अन मी त्याच्याकडे जेवायला जायचा. त्याच्याघरी वीणाबायच्या हातचे मटण खायचा मी. आमच्या घरला ना ॅनव्हेज चालत नाय ते खाऊन घ्यायचा. माझ्या घरला तो गुजराती ठेपला अन् खांडवी अन् काय काय खायला यायचा. अगदी लास्ट महिन्यात ही तो आला.. भाऊरावाची खासियत होती.. तो कदी वाईट बोलायचा

नाय. कुणामागे कुणाबद्दल वाईट बोलला असे नाय झाले कदी. सदा हसत रहायचा. देवालाबी असली माणस आवडत असणार. भाऊराव नेहमीच बिझी असायचा. रिटायर माणस असला बिझी म्हंजे थोडं ऑड वाटायचा. पन सदा तेच्या डोक्यात कायतरी आयड्या असायच्या. तो सांगायचा नाय मला पन विचारात असायचा हमेश. आता अप्पाजी बोलला ना तसा लिहायचा विचार करायचा बहुतेक. आदमी एकदम नेक होता. ॲक्टिव्ह होता. समद्यांना मदत करायचा. हमेश हसतमुख होता. अचानक देवाने बोलावला त्याला. आता तिकडे देवाला हसवत असेल. भाऊराव गेला. तेची याद हमेश मनात राहिल. भाऊराव तुला शांति भेटेल ही प्रार्थना .."

जसवंत शाह नमस्कार करून खाली बसले. दादा राऊत उभे राहिले बोलायला ..

"भाऊरावांबद्दल मी काय बोलणार? आपल्या सगळ्यात मी वयाने तसा कमी. म्हणजे भाऊरावांचा लहान भाऊ जणू. भाऊराव मला वडीलकीच्या नात्याने सल्ला द्यायचे. त्यांना एखाद्या प्रा ॅब्लेमचे आकलन लगेच व्हायचे नि त्यावर तोडगा ही सांगायचे. जसवंत शाह म्हणाले तसे भाऊराव सदा बिझी असायचे. बिझी म्हणजे काहीना काही कामात व्यस्त असायचे. एम्प्टी माइंड इज डेविल्स वर्कशॉप म्हणत कधी रिकामे बसायचे नाहीत भाऊराव. त्यांची पुस्तके मी वाचलीत. त्यांची लिहायची इच्छा त्यांना स्वस्थ बसू देत नसावी.. त्यांच्या एका पुस्तकातली गोष्ट आहे.. मरणांति वैराणि.. दोन जानी दोस्त ..

गैरसमजातून भांडतात.. जन्मभर एकमेकांशी अबोला धरतात.. त्यातील एक मरण पावतो. दुसऱ्याला कळते आपला गैरसमज कसा झाला ते पण तोवर त्याचा मित्र जगातून निघून गेलेला असतो.. त्यानंतर तो त्याच्या शोकसभेत भाषण करतो.. आपल्या दिवंगत मित्राचे चांगले गुण सांगतो.. आपल्या गेलेल्या मित्राला मोठे पत्र लिहितो.. सगळे काही सांगून माफी मागतो.. शेवटी लक्षात येते ते एकच.. बैल गेल्यावर झोपा करून उपयोग तो काय.. भाऊराव आज आपल्यात नाहीत. त्यांच्या आठवणी आहेत. सदा हसतमुख भाऊराव सदा मदतीला येणारे भाऊराव आठवतात. नित्यनेमाने व्यायाम करून भाऊरावांनी तब्येत चांगली राखली होती. एकाएकी काय व्हावे नि त्यांना या जगाचा निरोप घ्यावा लागला.. ते नसतील.. आपल्या चौकडीचे यापुढे त्रिकूट होईल.. तरी दरवेळी त्यांची आठवण येत राहील. भाऊराव म्हणायचे ते मला अगदी नीट आठवते आहे.. अगदी मनापासून पटलेली गोष्ट आहे ही.. भाऊराव सांगायचे मोठी माणसे कितीतरी होऊन गेली जगात. शिवाजी महाराजांपासून आंबेडकरांपर्यंत. सगळे जगाला काही न काही चिरंतन देऊन गेले. सगळेच काही असे महान होऊ शकत नाहीत. पण प्रत्येकानी आपले नेमलेले कामही सचोटीने केले तरी आपण कितीतरी पुढे जाऊ. त्यांची कथा आहे.. छाप. त्यातला कथा नायक हेच सांगतो.. आपल्या मर्यादित जगावर छाप सोडून गेलात तरी तुम्ही आयुष्यात खूप काही कमावले असे म्हणता येईल. या कथेप्रमाणेच भाऊराव वागले. त्यांची अमीट छाप आपल्या सर्वांवर सोडून ते

गेलेत. त्यांची आठवण सदैव आपल्याला प्रेरणा देत राहील. ईश्वर त्यांच्या आत्म्याला शांती देवो.."

दादा राऊत खाली बसले. वातावरण गंभीर झाले होते. क्षणभर सगळे शांत झाले.. भाऊराव आतापर्यंत शांत होते.. एकाएकी ते उभे राहिले ..

"मित्रांनो, धन्यवाद. मी तुमचा अत्यंत आभारी आहे. दोन गोष्टींसाठी. एक तर तुम्ही माझ्या बद्दल इतके चांगले बोललात.. आणि दुसरे त्याहून महत्त्वाचे .. कुणी माझ्या कल्पनेला अशुभ मानेल.. अभद्र मानेल पण तुम्ही ती ऐकून माझ्या मरणाआधीच ही भाषणं करायला तयार झालात. मला वाटते नेहमीच .. माणूस गेला की आजूबाजूचे हळहळतात.. तो किती चांगला होता सांगत राहतात. कमीत कमी शोकसभेत तरी. अगदी साधी माणसं जातात ना त्यांच्याबद्दल ही.. खूप केलं हो मुलांसाठी .. नाहीतर त्यांनी इतके सहन केलं.. दुसरं कुणी नसतं केलं वगैरे. मी म्हणतो त्याचा फायदा काय? माणूस जिवंत असताना सांगा की त्याला .. बाबा रे तू चांगला होतास नि आहेस.. तुझ्या गुणांबद्दल आम्हाला कौतुक आहे.. काय हरकत आहे? त्यासाठी तो मरण्याची वाट का पहावी? अगदी शत्रूवरही मरणानंतर टीका नाही करत आपण. मरणांतानि वैराणि म्हणत.. तर आपल्या सुहृदांना त्यांच्याबद्दल चार चांगले शब्द ते जिवित असताना ऐकवले तर त्यांना अजून हुरूप येणार नाही का? माझ्या या शोकसभेतील भाषणं मी गेल्यावर मला ऐकता नसती आली तर त्यांचा काय फायदा? दुसरे अजून एक.. जगात जन्म आपल्या हाती नाही आणि मृत्यूही. निसर्ग नियमानुसार

प्रत्येक गोष्टीस या जगात अंत आहे. तो नसता तर या जगाची कल्पना तरी करवली असती आपल्याला? तेव्हा मृत्यू ही नैसर्गिक आवश्यक आणि अटळ गोष्ट आहे. त्यात अपवित्र अशुभ आणि अभद्र काहीच नाही.. विरहाचे दु:ख जरूर आहे त्यात. जो जातो त्याचा शोक दुसरा कुणी वाहतो.. जाणारा या जगात असतानाच त्याला त्याच्या असण्याचे महत्त्व जाणवून द्या.. एकदा कृतार्थ झाल्यासारखे वाटू द्या.. तुम्ही सगळे माझ्या विनंतीस मान देऊन माझ्या शोकसभेस आलात या बद्दल मी मनापासून आभारी आहे.."

# कालबाह्य!



बदल हाच काळाचा स्थायीभाव आहे म्हणतात. एकेका पळाने काळ पुढे पळत असतो. क्षणोक्षणी तो बदलत असतो. काळ बदलतो तशा आजूबाजूच्या गोष्टी बदलत जातात. पूर्वी जीवनमूल्ये नामक एक प्रकार ऐकिवात असे. तो तर इतक्या झपाट्यात बदलत चालला आहे की काही वर्षांनंतर शब्दकोशातूनच तो बाद करावा लागला तर आश्चर्य वाटायला नको.

जीवशास्त्रीय संकल्पनेत प्राण्याचा एक जनुकीय संच असतो. तो प्राण्याची गुणवैशिष्ट्ये ठरवत असतो. या जनुकीय संचाबरोबरच आजूबाजूची परिस्थिती त्या प्राण्याची वागणूक वगैरे ठरवत असते. माणूस नामक द्विपाद तर सर्वात उत्क्रांत. तेव्हा उत्क्रांतीच्या या टप्प्यावर त्याने या सर्वांस वाकुल्या दाखवत उत्क्रांतीची कल्पनाच उत्क्रांत करून टाकली तर नवल नाही! थोडक्यात माणूस प्राणी निसर्गाशी पंगा घेणे सोडत नाही. आणि जनुकीय बदलापेक्षा तो आपल्या

गुणवैशिष्ट्यांत स्वतःहून बदल घडवून आणण्यात यशस्वी झाला आहे.. आणि हा बदल घडवणे हाच त्याचा स्थायी भाव झाला नसल्यासच नवल!

आमच्या लहानपणी शाळेच्या भिंतीभितींवर सुविचार आणि सुभाषिते असायची. असला अविचार आता मागे पडला असून हा सुविचाराधारित जगण्याचा मार्ग त्यामुळे बंद करण्यात आला असून त्या रस्त्यावरील ट्रॅफिक दुसऱ्या जलदगती मार्गावरून वळवून घेण्यात आला आहे. अर्थात त्यामुळे हल्लीची मुले सुभाषितांमागे धावत नाहीत. शाळेच्या भिंतींवर सुभाषिते जागा अडवत नाहीत. बदल हा स्थायीभाव असताना या सर्वांची नोंद ठेवणे गरजेचे आहे. काही शतकांनंतर संशोधकांना तरी उपयोगी पडावा असा दस्तावेज असावा या उद्देशाने ही नोंद करण्यात येत आहे.. अर्थात समकालीन माणसासही यातून शिकण्यासारखे काही आहेच.. बदल अनंत आहेत. काही छोटे काही मोठे. त्यातील काही महत्त्वपूर्ण बाबींची ही नोंद:

सत्यमेव जयते:

ही एक पूर्वी असणारी संकल्पना आहे ज्यात सत्याचाच विजय होतो असे मानले जाई. शेवटी सत्याचाच विजय होतो असे मानणारी माणसे असत. तसे कित्येकदा घडतही असे. काळ बदलला नि ही संकल्पना सत्याचा विजय सर्वात शेवटी होतो अशी झाली. पुढे पुढे सत्याचा विजय होण्याची वाट बघत कित्येक पिढ्या नाहीशा होऊ लागल्या. तेव्हा समाजधुरीणांना हे कालातीत सत्य असल्याचा साक्षात्कार झाला. त्यामुळे सत्य काय याचीच व्याख्या बदलण्याची

चलाखी त्यांनी विकसित केली. सत्ताधारी आणि धनवान, ताकदवान, शक्तिवान अशा वर्गातील लोक सत्य काय हे ठरवून त्यानुसार त्याचा विजय घडवून आणू लागले. या अर्थाने आजही ही घोषणा लागू पडत असली तरी तिचा मथितार्थ बदलला असल्याची नोंद करणे आवश्यक आहे. थोडक्यात सत्यच जिंकते ह्यात बदल घडून आधी सर्वात शेवटी सत्याचा विजय होतो असा झाला. आणि आता कालौघात अजून बदल होऊन 'सत्यमेव जयते' याचा अर्थ 'जे जिंकते तेच सत्य' असा झाला आहे.

प्रामाणिकपणा:

इमानदारीचा जमाना खूप जुना. इमानदारीचा इमानदारीने त्याग करून इनामदार बनणे ही काळाची गरज बनली. इनामदारीचे इनाम मिळवून आपले नाम कमवण्यासाठी इमानदारी अर्थात प्रामाणिकपणा किती कुचकामी आहे याची जाणीव आधीही लोकांना असे. पण हे समजून आणि उमजून घेणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस भूमिती श्रेणीने वाढत चालली. समाजाच्या बदलात ह्यांचे महत्त्व फार असून बदल हाच स्थायीभाव असल्याने यांचे वर्चस्व वाढत चालले तर नवल नाही. नाही म्हणायला प्रामाणिकपणाचे उदाहरण म्हणून कधीमधी रिक्षात विसरलेली पैशांची बॅग कशी परत केली वगैरे बातम्या पेपरात छापल्या जातात.. म्हणजे त्या प्रामाणिकपणाचा दुर्मिळपणा नि त्यामुळे त्यास असणारे बातमीमूल्य ध्यानात यावे.

पूर्वी प्रामाणिकपणा हा नुसताच पैशांसंबंधात नसून प्रत्येकाने आपापली जबाबदारी चोख बजावावी असा अर्थ अभिप्रेत असे. त्यात बदल होऊन किमान टेबलाखालून काही देवाणघेवाण केल्यावर तरी टेबलावरून कामे वेळेत केली जावीत ही व्याख्या सर्वमान्य झाली. सचोटी ही प्रामाणिकपणाची लहान बहीण मानावी अशी. पण खुद्द प्रामाणिकपणाची वाताहात होत असताना सचोटीताईच्या हालाची कल्पना कोणीही करू शकेल. त्यामुळे येत्या काही वर्षांत हा शब्दही शब्दकोशातून हद्दपार झाला तर नवल नसावे.

वक्तशीरपणा:

वेळ पाळणे नि वेळेवर सर्व कामे करणे, एखाद्याला दिलेल्या वेळेप्रमाणे त्यास भेटणे, वेळेवर सर्व कार्यक्रम पार पाडणे वगैरे वगैरे गोष्टी वक्तशीरपणात येत असत. पण माणूस हुशार झाला. क्षणाक्षणाला पुढे जाणारा घड्याळाचा काटा जर कोणाची तमा न बाळगता पुढे पुढेच जाणार असेल तर त्या यंत्रास बनवणाऱ्या माणसाने तरी त्या घड्याळाची नि त्याच्या काट्यांची तमा का बाळगावी? आता घड्याळ हे कालमापक माणसाने बनवले असेल.. पण माणूस सोयीस्करपणे त्या काट्याचा बदला वेळ नामक संकल्पनेवर घेऊ लागला. 'आज नहीं तो कल कल नहीं तो परसो.. इतनी भी क्या जल्दी जब जीना है बरसों' हे ब्रीद झाले. 'वक्तकी गुलामी' उत्क्रांत माणसाने सोडली .. त्यालाही काही वेळ उलटला.. तो किती ते मात्र घड्याळाच्या काट्यासारखे काटेकोरपणे सांगणे कठीण आहे!

वचन:

काहीही पाळणे हे कालबाह्य होत असताना वचनाने का मागे रहावे? पाळीव प्राणी पाळणे वगळता शिस्त, वेळ, वचन इत्यादी पाळणे हा मागासपणा झाला. पूर्वीचे ते प्रतिगामी असे काही करत असत. हरिश्चंद्र नामक कोणी राजा स्वप्नातील वचन पूर्ती करण्यासारखा अतिरेक करत असेल तर त्याला रिॲक्शन म्हणून जिते जागतेपणी दिलेला शब्द ही पाळू नये ही माणसाची कृती समर्थनीयच ठरते. अतिरेकी क्रियेची प्रतिक्रिया ही अतिरेकीच असायची! थोडक्यात वचनें किं दरिद्रत: हे खरे असले तर बोलावयाचे वचन आणि द्यावयाचे वचन यात मोठाच फरक आहे हे ध्यानात घेऊन दिलेले वचन पाळून दरिद्रतेस निमंत्रण द्यायचे का याचा निर्णय सामान्य लोक घेत आहेतच.. त्यात धडधाकट श्रीमंती ही पांगळ्या दारिद्र्यावर वरचढ असेल तर आश्चर्य ते काय? थोडक्यात 'मेरा वचन गीता की कसम' असले डायलॉग आता गंगामैयार्पण झालेत हे खरे.

अहिंसा:

'सत्य अस्तेय अहिंसा' असले विचार हा सुदृढ समाजाचा पाया आहेत.. पण यावर आधारित समाज आज आधीच सुदृढ झालेला असल्याने त्यांची आता विशेष गरज उरली नाही. थोडक्यात 'हिंसा परमो धर्म:' हे महत्त्वाचे.

आवश्यक तेथे हिंसा हे पुण्यकर्म अर्थात शौर्य समजले जावे आणि अहिंसा म्हणजे डरपोकपणा. समाजात स्थैर्य व शांतता हवी असेल तर बळाच्या जोरावरच ती करावी. उगाच अहिंसेच्या उल्लेखाने नाकाने कांदे सोलू नयेत.. या विचाराने समाज भारलेला आहे. 'बळी तो कान पिळी' हे युगानुयुगे चालत आलेले एकच सत्य त्यासाठी उपयोगी पडत आहे. कथा पुराणे आणि इतिहास अशा सर्व ठिकाणी बळ आणि शस्त्रांचा वापर होत असताना मध्ये काही वर्षे अहिंसेमुळे आलेली मरगळ झटकून आता हिंसा परम धर्मपदी पोहोचली आहे. बहुसंख्यांकांनी अल्पसंख्याकांवर बहुसंख्येच्या जोरावर केलेले राज्य यासच लोकशाही म्हणतात. त्यास अल्पसंख्य हिंसेने प्रत्युत्तर देऊ शकतात. तेव्हा अशी अल्प किंवा बहुसंख्य दोघांपैकी कोणीही केलेली हिंसा हीच समाजात रूढ बाब झालेली आहे. तेव्हा उगाच अहिंसेच्या नावाने कुणी गळा काढून शाब्दिक हिंसा करत आपली कालबाह्यता न दाखवणेच इष्ट.

पैसा:

'गरगरीत वाटोळा रूपया हाच देव' हे रोखठोक सांगणारे आजकाल दिसत नाहीत. सर्वांनी फक्त कृतीतूनच हे करून दाखवण्याचे ठरवले असल्याने प्रत्यक्ष कृतीतून पैसा हाच तो देव असल्याचा हा संकेत तळागाळापासून वरपर्यंत देण्यात येत आहे. पण ते देवाचा उपमर्द न करता. म्हणजे कुणी तसे म्हणत नाहीत आणि ईश्वरोपासना ही सोडत नाहीत. देवळातल्या देवाची आणि वाटोळ्या रूपयाची भक्ती कोणी सोडत नाही. पूर्वी ध्येयवाद वगैरे वादग्रस्त प्रकार ध्येयाने भारावलेले

लोक मानत असत. पण आता प्रत्यक्ष देवळातला देव आणि लक्ष्मी रूपातला देव यांनाच फक्त देवत्व दिले गेले आहे. देश हा देव असे माझा हे गाणे वर्षातून दोनदा वाजवून देशभक्ती सिद्ध होत असली तरी देवभक्तीसाठी मात्र उत्सवसमयी लाउडस्पीकरने ठणाणा गाणी ऐकवूनच ती देवापर्यंत पोहोचत असते. आणि लक्ष्मी पूजन मात्र क्षणश:कणश्चैव करण्याची गोष्ट सांप्रतकाली झाली आहे.

ध्येयवाद:

आधी म्हटले त्याप्रमाणे ध्येयवाद हा वादग्रस्त विषय आहे. पूर्वी कोणत्या न कोणत्या ध्येयाने प्रेरित आणि भारीत होऊन काही लोक झोकून देत काम करत असत. अजूनही ध्येय शब्द कालबाह्य झालेला नाही परंतु सत्याप्रमाणेच ध्येय शब्दाचा अर्थ सोयीस्कररीत्या बदलला जाऊन त्याप्रमाणे ध्येयवादी लोक तयार होत आहेत. उदाहरणार्थ, मोठी डिग्री घेऊन परदेश गमन.. अथवा येनकेन प्रकारेण धनप्राप्तीतून सुबत्ता वगैरे. अशी सुधारित ध्येये घेऊन झपाटून ध्येयप्राप्ती मागे लागणे हेच वास्तव असल्याचे ध्यानी घ्यावे.

हे सर्व कालबाह्य गुणविशेष असले तरी मानव जात ही शतकानुशतके टिकून आहे ती बदलांच्या जोरावर. परिस्थितीनुरूप बदल त्यास तग धरण्यास मदत करतो. जात, धर्म, पंथ, भाषा वगैरे मुद्द्यांवर माणूस कित्येक शतके एकमेकांशी भांडत आला आहे. आजवर स्वतःहून अन्य या बाबतीत कसा

कनिष्ठ आणि स्वजात स्वधर्म स्वभाषा इ. कसे श्रेष्ठ हे माणसाने शतकानुशतके कालातीत जपलेले गुण आहेत. काळाच्या कसोटीवर टिकून राहिलेले हे सारे जतन करून कालबाह्य गोष्टींचा त्याग करणे हेच माणसाचे माणूस म्हणून कर्तव्य आहे. कदाचित पुढे मागे यालाच माणूसपणा असे ही संबोधले जाऊ शकते! तेव्हा आजही जुन्या मूल्यांना कवटाळून कुणी बसले असेल तर वेळीच सावध व्हा, सजग व्हा आणि मुख्य म्हणजे माणूस व्हा.. अर्थात समकालीन माणूस व्हा..

नाहीतर तुम्हीच उद्या कालबाह्य होण्याची शक्यता आहे!

# अपमार्केट!

फार पूर्वी जाणत्यांची एक जमात होती. लोकांना उपदेश करणे हा या देशी जाणत्यांचा उद्योग. शहाणे करोनी सोडावे सकळ जन म्हणे! साधी गोष्ट. सगळेच सगळीकडे शहाणे झाले तर कोण कोणाला काय समजवणार? पण नाही. उपदेशाचे डोस पाजत पाजत 'सकल मति प्रकाशु' उद्योग सुरू होते मंडळींचे. नशिबाने आजकाल ही जमात डायनोसॉर सारखी नामशेष झाली. कित्येक शतकांपूर्वी संत महंत होऊन गेले त्यानंतर ही पैदास बंदच झाली. अर्थात तसे संत म्हणवून घेणारी असंत मंडळी आहेत थोडीफार. पण म्हणून त्या जुन्या ओरिजिनल संतांची महती काही कमी झाली नाही.

आता ते सांगायचे ते काय? पेरते व्हा पासून ते जाणते व्हा पर्यंत सगळा उपदेश. नेणते व्हा.. शहाणेसुरते व्हा वगैरे वगैरे. आता शहाणे व्हा समजू शकतो, पण सुरते व्हा म्हणजे काय? तरीही काही दीडशहाणे हा उपदेश भलताच मनावर घेत अतिशहाणे बनत. पण हे सारे सल्ले म्हणजे जुन्या जमान्यातले डाऊनमार्केट सल्ले म्हणावेत. असल्या उपदेशांत 'ती' गंमत नाही. उपदेश कसे अपमार्केट हवेत.. म्हणजे काय? अपमार्केट हा अपवादात्मक मराठी शब्द नाही. 'अप'शब्द तर नाहीच नाही. आंग्ल भाषेच्या वाघिणीच्या दुधातून आलेला 'अपमार्केट' हा तितकाच अपमार्केट शब्द आहे!

काही उदाहरणांचे हरण करून समजून घेऊ..

आता जोशीकाकांचे उदाहरण बघा. एकतर त्यांना काका म्हटले की तद्दन देशी वाटते. कमीतकमी अंकल म्हणावे की नाही? तर जोशी अंकल.. अंकलनी आटापिटा करून एकुलत्या एक पोराला शिकवला. मोठा केला. अतिशिक्षितास आपल्या देशात स्थान नाही म्हणून परदेशी धाडला. आपल्या 'साफल्य' नामक बंगल्यात मेहनतीचे सार्थक झाले म्हणत अंकल एकटेच राहतात. सगळयांना पुत्रमहिमा ऐकवतात. मधून मधून पुत्रही पितृप्रेमाने प्रेरीत होऊन इंड्यात येऊन भेटतो.. जोशी अंकल चार दिवस सरबराई करतात. पाचव्या दिवशी एरोड्रोमवर मोठी गाडी करून सोडून आले की श्रमसार्थकतेने परततात.. सांगताना म्हणतात, 'पोराने नाव उज्ज्वल केलं..'

जोशी अंकलचं वय होत आलं तर 'लागले नेत्र पैलतीरी' तो विचार मनात आला की सांगतात,

'आता हेच बघा.. उद्या मी गेलो.. तर लोकं काय म्हणतील? मुलगा यायचाय युएसेतून.. बॉडी सांभाळून ठेवा! तुम्हाला सांगतो त्या बॉडीला ही अभिमान वाटेल त्याची वाट पाहात अंतिम सोहळयासाठी कोल्डस्टोरेज मध्ये ताटकळताना.' खरंय की नाही? नाहीतर मुलगा कुठे .. नाशकात? एवढ्या जवळ असून आला नाही हो.. आजकालची पोरं, आईबापाची कदर म्हणजे नाही. हे ऐकायला बरं वाटतं का? ॲब्रॉड मधून येणार म्हटले की दृष्टिकोन आपोआप ब्रॉड होतो.. म्हणून आपल्या मुलांना शिकवा, मोठे करून परदेशी धाडा. म्हणजे आपल्या पश्चात लोकं म्हणतील.. 'पोरांनी नाव काढलं हो.. हां तसा बापाजवळ

नसायचा तो पण परदेशातून येणंजाणं शक्य आहे का? आणि तिकडे सगळेच स्ट्रिक्ट हो. ते हरित कार्ड मिळवायचे म्हणजे? देशमोह नि पितामोह आवरावा लागतो..'

पितामह मोठया उत्साहाने पुत्रमहती सांगतील .. थोडक्यात असे अपमार्केट थिंकिंग हवे!

नाहीतर, मुलं शिकून काय करतात? एक आटगावात दुसरा पाटगावात? असतील मोठया पोस्टवर. पण त्यात काय ग्लॅमर आहे?

विचार बदला.. अपमार्केट व्हा! मुलांना 'एनाराय' बनवा! ताठ कॉलरने स्वर्गस्थ होण्यास तयार व्हा!

या भडकमकर आंटीकडे पहा..

म्हणजे आता 'आंटी' म्हटल्यावर राग यायचे वयही उलटून गेले त्यांचे. काकू सारखा काकूबाई शब्द त्यांच्या नावापुढे कोणी लावत नाही याचेच समाधान हल्ली. अशा वयातील त्या इंग्रजी प्रचुर मराठी बोलतात. मिठायांवर काजू पिस्ते बदामाचे काप विखुरतात तसे आपल्या मराठीत इंग्रजी शब्द विखुरतात. त्यांना ठाऊक आहे, मराठी तशी आहेच एकदम डाऊनमार्केट. एअरपोर्ट नि चकाचक मॉलमध्ये ही मळकट मातकट रांगडी भाषा? नाइलाज म्हणून त्या भाषेच्या सांगाड्यात आंटी इंग्रजी शब्द फिट करतात. नाइलाज इतकाच की त्यांनी त्यांच्या यूथ मध्ये इंग्रजी शिक्षण विशेष घेतले नाही. पण बाई द्रष्ट्या. इंग्रजीची महती भल्याभल्यांना कळली नसेल. बाईंना कळली. त्या

महत्प्रयासाने इंग्रजी शिकल्या. म्हणजे शब्द शिकल्या. त्या इंग्रजी हिऱ्यांना मराठीच्या कोंदणात बसवत्या झाल्या. डाऊनमार्केट मराठीचा त्याग करत अपमार्केट मराथीकडे वळल्या. महिलामंडळात जाणाऱ्या बाई आज क्लबात नि लेडिज सर्कलमध्ये भडकमकर मॅडम म्हणून ओळखल्या जातात. महिला मंडळासारख्या बॅकवर्ड वर्डचा त्याग करत मॅडम क्लबात जाऊन फा ॅरवर्ड झाल्या. मराठी अमृताते पैजा जिंकायची.. ते दिवस गेले. अर्थात बाईंना अशा पैजांत इंटरेस्ट नव्हता. अपमार्केट मिंग्रजीतून बाईंनी स्वतःचा उद्धार करवत बाई मधून त्या लेडिज वर्गात सामील झाल्या. क्लबात पत्त्यांवर पैजा लावण्याचा इंटरेस्ट 'डेव्हलोप' झाला त्यांच्यात. थोडक्यात परत तेच.. विचार बदलला. आणि भडकमकर बाई, सॉरी भडकमकर मॅडम अपमार्केट झाल्या!

आता आमचा हा गोपू पहा.

गोपू? हे काय नाव झाले? गोपू म्हणजे फार साधासुधा. सरळसोट. नाकासमोर पाहात चालणारा. त्याच्या एकदा ध्यानी आले.. गड्या हे काही खरे नव्हे! संन्याशाच्या लग्नास शेंडीपासून तयारी म्हणतात. तसा गोपू संन्यासी नव्हता, ना ही त्याला शेंडी होती. पण ही एक बोलण्याची पद्धत. गोपूने पहिले बदलले ते नाव. मित्रमंडळी त्याला गोप्स म्हणायला लागली. तिथेच त्याने अर्धी लढाई जिंकली. कॉलेजात पोरी त्याला गोप्स म्हणत तेव्हा त्याला कसे हॅपनिंग झाल्यासारखे वाटे. मग आले ते कपडे. त्यानंतर पादत्राणे. गोपूला दुनियेचा दस्तूर कळला होता. एक नूर आदमी आणि शंभर नूर बाकी सारे. पॅकिंगचा जमाना

असल्याचे गोपूच्या ध्यानी लवकर आल्याने गोपूची लवकरच सुधारित आवृत्ती आली. साधी राहणी ही अत्यंत डाऊनमार्केट. उच्च राहणी महत्त्वाची. विचारसरणी साधी असायला काहीच हरकत नाही कारण ती बघण्याची बाब थोडीच आहे. एखाद्या परीक्षेत पोरशनमध्ये असलेल्या धड्यांवरच प्रश्न येतात. तर लोकांच्या नजरेच्या परीक्षेत विचारसरणी वगैरे विचार अगदीच आऊट ऑफ पोरशन हेही गोपूला कळले. थोडक्यात वरलिया रंगासच भुलण्याचे दिवस आले हे डोंगा ऊस न चोखताच त्याला कळले हे त्याचे द्रष्टेपण. त्यामुळे एखाद्याची कोती, ऱ्हस्व दृष्टी ही कोणत्याही दृष्टीने समकालीन मनुष्यास जोखण्याचे प्रमाण नाही आणि त्याचा बाह्यावतार हाच खरा अवतार इतके त्याच्या ध्यानी आल्यावर गोपू अपमार्केट न होता तरच नवल! थोडक्यात काय तर विचार करा.. अपमार्केट होण्यासाठी 'जे जे जगी जग ते तया ते ते करा..' आणि अपमार्केट व्हाच एकदाचे.

सांगायचा मुद्दा हा की अपमार्केटत्वास पर्याय नाही. प्रगती पथावर जायचे असेल तर अपमार्केट व्हा. डाऊनमार्केट गोष्टींचा त्याग करा. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात अपमार्केटत्वासाठी काही न काही मार्ग आहेत. गोपूसारखे डोळे उघडे ठेवून बघितले तर उगाच इतरांच्या प्रगतीने डोळे दिपण्याची वेळ यायची नाही. म्हणजे काही 'सदा सत्य बोला यथा तथ्य चाला' वगैरे बोले तैसे चालणारी मंडळी असतात. त्यात ध्यानीमनी वसणारी ही सर्व सुभाषिते ही निव्वळ भाषासौंदर्यासाठी बनवलेली वाक्ये आहेत हे बिंबवणे महत्त्वाचे. अगदी

लहानपणापासूनच अपमार्केट व्हायचे तर मराठी मिडियमातून इंग्रजी नि त्यातही कॉन्व्हेंट मधून एज्युकेट व्हा. राज्य शालेय शिक्षणापासून दूर जाऊन आंतरराष्ट्रीय शिक्षणाचा ध्यास घेतल्यास आपापल्या डाऊनमार्केट मदरटंगपासून नि तत्सम भारतीय लँग्वेजेस पासून सुटका होऊन लहानपणापासूनच इंग्रजीचे आंग्लाळलेले बाळकडू पाजता येईल.. अर्थात बाळकडूची कन्सेप्ट तशी डाऊनमार्केट आहे हे लक्षात घेऊन आम्ही हे सांगतो आहोत. श्यामची आई कधीच जुनी झाली. आता अपमार्केट हॅरी पाॅटर आला. येरे येरे पावसा अगदीच सुमार बालगीत. त्यापुढे 'रेन रेन गो अवे' असली बडबडगीते आमची अपमार्केट बाळे गाऊ लागली. काय? 'बडबडगीत? नो पापा.. नर्सरी ऱ्हाइम्स यस पापा' म्हणायला लागले. थोडक्यात खाकी चड्डीत खोचलेल्या पांढऱ्या शर्टा ऐवजी टाय नि चकचकीत बूट नव्या अपमार्केट जमान्याची लक्षणे होऊन राहिली. तेव्हा ध्यानात ठेवा, टीपटाॅपत्वास पर्याय नाही. सारे काही चकचकीत असणे हीच प्रगतीची लक्षणे.

लग्नाचे उदाहरण घ्या. लोक पूर्वी मंडप घालून लग्न लावत. कुणी अर्ध्या दिवसांत सारे आटोपत तर कुणी एक दिवसात. भर उन्हाळ्यात असले तर चारपाच मोठाले पंखे फिरत. जमिनीवरील लाल सतरंज्यांतून ओबडधोबडपणा झाकला जाई. मंडपाच्या कपड्याआड विवाह सोहळ्यातील मानापमान साग्रंसगीत पार पडत. पुढे मंगलकार्यालयातील कार्ये वातानुकूलित हाॅलमध्ये आली नि त्यानंतर फाइव्हस्टार हाॅटेलात अपमार्केट म्हणत अप अप जाऊ लागली. आता ती डेस्टिनेशन वेडिंगपर्यंत पोहोचली. आता अपमार्केट लग्नात

कमीतकमी चार दिवस सोहळा हवाच. त्यात राष्ट्रीय चित्रपटांपासून प्रेरणा घेऊन सारे समारंभ हवेत. लग्ने टिकोत वा न टिकोत.. समारंभ इज अ मस्ट. मग मधुचंद्रासाठी थेट मॉरिशस .. नाहीतर स्वित्झर्लंड वगैरे ठिकाणी. विचार करा, कुठे जाणार हे कोणाला सांगताना महाबळेश्वर आणि मॉरिशस यांपैकी कोणामुळे तुमची किंमत वाढणार आहे? गाडीतून उतरताना तुमचे पाय साध्या गाडीतून बाहेर पडतात की पायांची शान वाढवणाऱ्या अपमार्केट आलिशान गाडीतून.. या पायावर त्या पायावरल्या देहाची किंमत केली जाते.. तेव्हा अशा अपमार्केट थिंकिंगला पर्याय नाही.

थोडक्यात जीवनाच्या विविधांगांचा विचार तसा डाऊन मार्केट म्हणावा. उच्चराहणीला साध्या विचारसरणीची जोड देण्याचा अपमार्केट विचार करा.. तसा विचार न केल्यास आयुष्याच्या मार्केटातील तुमचा भाव कमी होऊन तुम्ही डाऊन डाऊन अगदी तळाशी गाडले जाल.. तेव्हा उघडा डोळे.. बघा नीट.. विचार करा.. अपमार्केट विचार करा.. बी अपमार्केट.. ॲज फास्ट ॲज यू कॅन.. आऊटडेटेड होण्याआधी!

आता हा उपदेश कोणी केला? जुन्या जमान्यातल्या संतांचे काम नोहे हे.. तर आमचेच एक जनरल ऑब्झर्वेशन.. आता इतके सांगून रजा घ्यावीच लागेल. कारण आम्हीही प्रयत्न करत आहोत अपमार्केट होण्याचा .. वेळ दवडून चालायचा नाही.

आणि तुम्ही? बघता काय? सामील व्हा! लेट्स बी अपमार्केट! असॅप!

# तेव्हा कुठे गेला होता..

जमाना बदललाय. बदलतोय. अजून बदलेल. आणि बदलणार नाही तो जमाना कसला? म्हणजे प्रश्न प्रश्न विचारण्याबद्दलचा आहे.

पूर्वी सवालजवाब घडत. कुणी प्रश्न विचारे, कुणी उत्तर देई. प्रश्नच नव्हता तेव्हा. पण आता जमाना बदलला. तशी स्टाईलही बदलली. 'तेव्हा कुठे गेला होता राधासुता तुझा धर्म?' हा प्रश्न विचारून प्रत्यक्ष श्रीकृष्णाने सगळ्यांची सोय करून ठेवलेली. पण इतक्या पुराणकालीन पद्धतीचा उपयोग मात्र आम्ही करंट्यांनी हल्लीच सुरू केलाय! आपला वारसा इतकी वर्षे विसरलेलो आपण, तो जतन करणे अलिकडे आम्ही मनावर घेतलेय.. म्हणजे प्रश्नाचे उत्तर म्हणून अजून एक प्रतिप्रश्न! मूळ प्रश्नाचे उत्तर शोधण्याहून हे सोपे. मूळ प्रश्न अडचणीत आणणारा असेल तर त्या अडचणीतून वाट दाखवणारा हा प्रतिप्रश्न, 'तेव्हा कुठे..?'

मूळ प्रश्न सुटो वा न सुटो, त्याचे उत्तर मिळो वा न मिळो, प्रतिप्रश्नाने प्रतिपक्षास निरूत्तर करून आपला किल्ला राखणे ही नवीनतम पद्धत! त्यामुळे स्वत:ची पत सांभाळता येते, मूळ मुद्दयास मुरड घालता येते नि प्रतिस्पर्धी प्रश्नकर्त्यास नुसतेच निरूत्तर नव्हे तर चारी मुंड्या चीत करता येते. सार्वजनिक जीवनात याहून परिणामकारक अजून काय असू शकते?

प्रश्नाने प्रश्न वाढवणाऱ्या या पद्धतीचा विकास मात्र अलिकडेच झाला असे दिसते. म्हणजे समाज माध्यमे ऊर्फ सोशल मिडियाने सामान्यातिसामान्यास आपले ज्ञान पाजळण्यास फुकटचा प्लॅटफाॅर्म उपलब्ध करून दिला काय नि त्याचा क्लोरोफाॅर्म सारखा परिणाम होत जनसामान्य (आनंदातिरेकाने) बेहोष होत व्यक्त होत सुटले काय.. मग कोणी कोणास प्रश्न विचारावे.. कोणी कोणास निरूत्तर करावे? तेव्हा चर्चा करण्यासाठी विविध विषय उपलब्ध झाले. चावडीवरच्या गावगप्पांना ग्लॅमर उपलब्ध करून दिले गेले. मग कुणी कोणास अडचणीत आणणारे प्रश्न विचारता झाला.. आणि आम्हाला प्रत्यक्ष श्रीकृष्णाने दाखवललेली प्रश्नास प्रतिप्रश्न करण्याची पद्धत आठवली. आता एकच लक्ष्य.. चर्चेत हार न जाणे.. प्रश्नकर्त्यास खजील करणे.. मूळ मुद्दयाचा उहापोह होणे न होणे हा भाग अलाहिदा! अगदी टाॅपच्या राजकारण्यांपासून ते आम आमदनी असलेल्या आम आदमी पर्यंत अंगीकारलेली ही पद्धत .. एकदम हिट!

आता पुराणातीलच कशाला, ही घ्या अर्वाचीन लेटेस्ट वानगी.. कुणी एक प्रश्न करतोय.. कुणी एक त्याला उत्तर म्हणून प्रतिप्रश्न करतोय! बघा हे मासले.. उद्बोधक नि नेत्रुघडक! (नेत्रुघडक हा शब्द ही मराठी भाषेस देणगी.. आय ओपनरचे हे भाषांतर!)

काही प्रथा अशा आहेत की त्या कालबाह्य आहेत.. बदलल्या पाहिजेत..

- तुम्हाला ह्याच दिसतात? आपल्याच दिसतात? 'त्यांच्या'कडच्या वाईटाबद्दल नाही बोललेलात कधी?

महागाई किती वाढलीय नाही?

- तुम्हाला आजच दिसतेय ती? आधी कधी बोलला नाहीत ते?

मंदी आलीय म्हणे. काही खरं नाही..

- आजच आलीय? पंधरा वर्षांपूर्वी आली तेव्हा का नाही उघडलंत तोंड तुमचं?

आजकाल ना सगळंच बिघडलंय. ताळ नि तंत्र..

- हो ना! आजच पहिल्यांदा घडतंय. नाहीतर पूर्वी सगळे कसे ताळ्यावर होतेच जणू!

समाज म्हणून आपण पुढे जातोय की मागे तेच कळत नाही!

- कसं कळणार? मागे वळून आताच पाहाताय? इतकी वर्षं नाही पाहिलंत कधी?

अमुक अमुक ने काही सांगितले त्या दिवशी. बरोबर आहे म्हणणे. पर्यावरणाचे रक्षण आपणच नको करायला?

- करा की! पण आमच्याच सणाच्यावेळी बरे आठवते पर्यावरण? 'त्यांना' पण सांगून बघा एकदा.

पुराणतली वानगी पुराणात राहू द्या. जमाना बदलतोय.

- अर्थात बदलतोय. गेले ते दबून राहायचे दिवस! पुराणांशिवाय दुसरे आहेच काय? ती पुराणेच महत्वाची. तुम्हाला 'बाकी'च्यांचे दुर्गुण दिसतच नाहीत की काय?

अहो, कसले कसले टॅक्सेस लावलेत सरकारने.. आता टॅक्स भरण्यावरही सर्विस टॅक्स लावतील..

- काय हो? टॅक्स काय आजपासून आलाय? गेली पन्नास वर्षे होता कुठे?

सरकारचे डोके ठिकाणावर आहे काय?

- अर्थातच.. आणि हा प्रश्न टिळकांनाच शोभतो. डोके ठिकाणावर नसते तर तुम्ही हे लिहायला जिवंत तरी राहिला असता काय?

लोकशाही धोक्यात येतेय.. रात्र वैऱ्याची आहे

- वा! हे बोलताय ना? अजून जिवंत आहात ना? मग कुठे आलाय धोका न बिका? पंच्याहत्तरसाली नाही विचारलात हा प्रश्न?

आपल्या देशात ना नुसती बेबंदशाही माजलीय. कोणाचा पायपोस कोणात नाही. भ्रष्टाचार बोकाळलाय..

- अस्सं? मग पूर्वी कधी नाही बोललात ते? आणि ट्रॅफिक पोलिसाला सिग्नल तोडल्यावर देता बिना रिसिट पैसे ती काय दक्षिणा असते?

बाबा बुवांचं प्रस्थ दिवसेंदिवस वाढताना दिसतंय. काय करावं?

- का? धर्माभिमान काही आहे का नाही? 'त्यांचे' बाबाबिबा दिसत नाहीत? बोलून बघा त्यांच्याबद्दल.. तेव्हा का जीभ जड होते?

इतिहासाची चांगलीच तोडफोड चाललीय शाळेच्या पुस्तकांत..

- का बोचतंय आता? खरा इतिहास जेते लिहितात! तेव्हाचा इतिहास इतिहासजमा होतोय पण तो लिहिला जात असताना बरे गप्प होतात?

अहो डार्विन गेला पुस्तकांतून बाहेर.. काय चाललंय?

- जाणारच! इतके दिवस राहू दिलं त्याला तेच चुकलं. तेव्हा नाही म्हणालात, कसा काय राहू दिला? बाय द वे, हा डार्विन कोण?

हवामान चांगलेच बदलतेय. ग्लोबल वॉर्मिंगची वॉर्निंग देताहेत शास्त्रज्ञ..

- शास्त्रज्ञ? शास्त्रांनी समाजाचं जेवढं नुकसान केलं ते अजून कुणी केलं नसेल. आपल्याकडे शतकांपूर्वी सांगून झालंय सगळं. त्याबद्दल कधी प्रशंसेचं लिहिताना दिसला नाहीत ते?

शिक्षणव्यवस्थेचं काही खरं नाही. कधी सुधारणार आपण?

- हो ना! पंचाहत्तरवर्षांपूर्वीच्या शासनकर्त्यांना नाही कधी विचारताना दिसलात ते?

हे आणि असे कित्येक प्रश्न. त्यांनी समाजमाध्यमांच्या नद्या दुथडीभरून वाहताहेत. पूर आला आहे जणू. विविधांगी चर्चा घडताहेत.. विविध विषयावर व्यक्ती व्यक्त होताहेत.. पण सरतेशेवटी विजय 'तेव्हा कुठे होता..?' या प्रतिप्रश्नानेच होतोय. तेव्हा हे सारे वानगीदाखल. पुराणातील वानग्यांना आज चांगले दिवस येताहेत. ती पुराणातून बाहेर पडून दैनंदिन जीवनात आता शिरकाव करताहेत. आता ह्या उदाहरणादाखलच्या वानग्या पण वापरात काढा.

काढाच. कारण जमाना बदलतोय. आपण ही बदलूया. बदलायलाच हवं? हो की नाही?

- काय म्हणता? आधी कधी बदलण्याची भाषा केली नव्हती?

अहो, नसेल केली.. पण इट इज नेव्हर टू लेट.. हो की नाही?

घ्या मग..

आधुनिक पुराणातील वानग्यांचं भरीत बनवायला! कुणी काही म्हणू देत, शेवटचा शब्द आपला.. तेव्हा कुठे गेला होता राधासुता तुझा धर्म?

प्रश्नास उत्तर प्रतिप्रश्न.. हेच आपलं उत्तर!



# डॉ. नितीन मोरे

यांची

६२

प्रकाशित पुस्तके

























डॉ. नितीन मोरे


लाडोबा
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
INSTANT
कालिदास




डॉ. नितीन मोरे
तेवढं सोडून बोला
एकपात्री
नाटक


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे


एका डॉक्टरची
कोविडकथा
डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
न केलेली भाषणे

# चक्रमादित्य भाग १ ते ५




























डॉ. नितीन मोरे
Version 2.0.2.0




HOSTEL-I


डॉ. नितीन मोरे




डॉ. नितीन मोरे
एका नाटकाची गोष्ट!


डॉ. नितीन मोरे




डॉ. नितीन मोरे
आणि



डॉ. नितीन मोरे
व्यक्ती आणि कथा ४



राजा दरबारी

डॉ. नितीन मोरे

डॉ. नितीन मोरे








डॉ. नितीन मोरे
घरात


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
सांगतो ऐका


डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे




डॉ. नितीन मोरे


डॉ. नितीन मोरे
मेल्यानिया डायरी-2
काही पाने


डॉ. नितीन मोरे
मी मेल्यानिया बोलते


डॉ. नितीन मोरे
मेल्यानिया डायरी-3


डॉ. नितीन मोरे
'इका'गाईच्या कविता


डॉ. नितीन मोरे
मेल्यानिया डायरी
काही पाने


डॉ. नितीन मोरे
ऐसी अक्षरे


Jackson!


सुलट


डॉ. नितीन मोरे
ऑर्वेलच्या फार्मात!

# ई साहित्य प्रतिष्ठानचे हे अठरावे वर्ष

# डॉ. नितीन मोरे यांचे हे त्रेसष्टावे पुस्तक.

डॉ. नितीन मोरे यांचे मनःपूर्वक अभिनंदन. डॉ. नितीन मोरे एक यशस्वी श्वसनरोगतज्ज्ञ आहेत आणि एक उत्साही लेखकही. त्यांच्या लेखनात एक टवटवी असते. ते बालसाहित्यही लिहितात आणि तरुणांसाठीही. गंभीरही लिहितात आणि विनोदीही. त्यांचा विनोद कोणाच्या व्यंगावर आधारित नसतो, स्तर सोडत नाही. समाजातील अनिष्ट विसंगतीवर ते आपल्या विनोदातून नेमकं बोट ठेवतात. समझदार वाचकांना त्यांचा इशारा काफ़ी असतो. त्यामुळे त्यांच्या नर्म विनोदाचा एक फ़ॅनवर्ग निर्माण झाला आहे. ते फ़क्त विनोदी साहित्य नव्हे तर निरनिराळ्या प्रकारचे लेखन लिहीतात. त्यांनी गेली अनेक वर्षे आपले लेखन निरंतर चालू ठेवले आहे. त्यांना प्रकाशक मिळायला तोटा नाही. पण त्यांना आपली पुस्तके जास्तीत जास्त लोकांपर्यंत नेणारे आणि प्रकाशनप्रक्रिया सुलभ असणारे प्रकाशन हवे होते. त्यांनी ई साहित्यची निवड केली.

डॉ. नितीन मोरे यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्य-च्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते. मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले (९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर (९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद (१६), अविनाश नगरकर (४), डॉ. स्मिता दामले (९), **डॉ. नितीन मोरे (६३ पुस्तके)**, अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा (३), मधुकर सोनावणे (१२), अनंत पावसकर (२३), मधू शिरगांवकर (८), **अशोक कोठारे (१०००० पानी महाभारत)**, **श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ)**, मोहन

मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १८ पुस्तके), विनीता देशपांडे (७), उल्हास हरी जोशी (९), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (१२), **डॉ. वृषाली जोशी- जागतिक वाङ्मय अनुवाद (६२ पुस्तके)**, डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी (७), डॉ. नंदिनी धारगळकर (१५), अंकुश शिंगाडे (४०), आनंद देशपांडे (३), डॉ. नीलिमा कुलकर्णी (५), अनामिका बोरकर (३), अरुण फडके (६), स्वाती पाचपांडे (२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे (५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट (५), अरुण कुळकर्णी (१५), जगदिश खांदेवाले (६), पंकज कोटलवार (६), डॉ. सुरुची नाईक (३), डॉ. वीरेंद्र ताटके(२), आसावरी काकडे (१४), **श्याम कुलकर्णी -मूळ वाल्मिकी रामायण३३)**, किशोर कुलकर्णी, रामदास खरे (६), अतुल देशपांडे, लक्ष्मण भोळे, दत्तात्रय भापकर, मुग्धा कर्णिक (५), मंगेश चौधरी, प्र. सु. हिरुरकर (३), बंकटलाल जाजू (८), प्रवीण ना दवणे, आर्या जोशी, **डॉ. सरोज सहस्त्रबुद्धे- वैद्यक विज्ञान(१६),** अरविंद बुधकर (४), जयश्री पटवर्धन (७), श्रीरंग कौलगी (५), यशवंत कदम(११), पांडुरंग सूर्यवंशी (४), सुधीर कारखानीस (८), मिलिंद कपाळे, मुकुंद कर्णिक(३), श्रीराम काळे (८), शैलेश पुरोहित (४), बी बी देसाई (२), श्रीनिवास शारंगपाणी(४), रामकृष्ण बाक्रे(३), विजया टिळक, संजय टाकळगव्हाणकर(२), पांडुरंग भागवत, मिलिंद बेंबळकर, गायत्री साळवणकर(४), भारती बिर्जे डिग्गीकर(३), विकास भावे, डॉ सुनील सावंत(२), अशोक बेंडखळे(५), सुहास साने, सुवर्णा लेले, **प्राचार्य शशिकांत कर्डेकर**(१७ भूगोल विज्ञान विषयक), स्वाती वर्तक, भारती सावंत, अभिषेक ठमके, हर्षवर्धन यादव(२), दिगंबर सलगर(४), कैलास बडगुजर, **श्रीपाद काळे- समग्र ऋग्वेद(१०)**, वैभव पाटील, चारुलता काळे, अनिल शिणगारे, स्वाती वर्तक(२), प्रमोद नाईकवाडे, सुधीर शास्त्री, रुपेश मराठे, सुप्रिया उपाध्ये, संजीवनी कुलकर्णी, मनोहर सुरवाडे(३), श्रेणिक सारडे (६), दिलिप ठाकूर, धनंजय कुलकर्णी, मिलिंद चौधरी, जोसेफ तुस्कानो, सुभाष धारणकर, सचिन कुल्ली(३),

विश्वनाथ मानकर, अर्चना सहस्रबुद्धे असे अनेक ज्येष्ठ व अनुभवी, कसलेले लेखक ई साहित्याच्या द्वारे आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये । विशेषीं लोकीं "ई"यें ।

दृष्टादृष्ट विजयें । होआवे जी ।

esahity@gmail.com

www.esahity.com

**9869674820** (for free books on whatsapp)